दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



नववर्षाच्या निमित्ताने ईशाला वडील धर्मेंद्र यांची आठवण आली... (पान ६ वर)



भारतीयांचा राग असलेल्या देशातच टीम इंडियाचा दौरा... (पान ७ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६ अंक : १५० वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

# राहुल नार्वेकरांची दादागिरी!

## हरिभाऊ राठोड यांचा गंभीर आरोप, म्हणाले- अजूनही वेळ गेली नाही, अन्यथा कोणालाही सोडणार नाही

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईत मोठा वाद निर्माण झाला आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी कुलाबा परिसरात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राजकीय पक्षांच्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरू दिले नाहीत, असा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. तसेच बीएसपी नेते व माजी खासदार हरिभाऊ राठोड आणि राहुल नार्वेकर यांच्यात देखील वाद झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी हरिभाऊ राठोड यांनी पत्रकारांशी संवाद साधताना माहिती दिली आहे.

पत्रकारांशी बोलताना हरिभाऊ राठोड म्हणाले, राहुल नार्वेकर मला म्हणाले की माझे सगळे प्रिव्हीलेज मी काढून घेईन. मी म्हटले साहेब तुम्ही मला फाशीवर चढवू शकता. त्यावर ते म्हणाले की तुम्हाला माहित असून सुद्धा माझ्यासोबत का पंगा घेताय मग? हे सगळे मी रेकॉर्ड केले आहे. मी त्यांना म्हटले की मला माहीत आहे की तुम्हाला तुमच्या भावाला, बहिणीला आणि वाहिनीला उमेदवारी द्यायची आहे. यासाठी धमक्या देत आहेत. आमच्या बीएसपीच्या कार्यकर्त्यांना धमक्या दिल्या, त्यांना बाहेर काढले.

पुढे बोलताना हरिभाऊ राठोड म्हणाले, संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीने हे सगळे केले आहे. तो कृष्णा जाधव, तो म्हणतो की टोकन आम्ही नाही दिले. मी म्हटले तुमचे लोक काऊंटरवर बसवले आहेत, तो म्हणतो ते आमचे लोक नाही. मग चोर आहेत का? कोण आहेत ती माणसं? असा सवाल राठोड यांनी उपस्थित केला.

या संदर्भातील सगळी माहिती आम्ही गागरानी साहेबांना सांगितली आहे. आम्ही 12 लोक आहोत, आताही वेळ गेली नाही. आमचे अर्ज घेण्यात यावे, अन्यथा आम्ही कोणालाही सोडणार नाही, असा इशाराही हरिभाऊ राठोड यांनी दिला आहे. हरिभाऊ राठोड यांनी पालिका आयुक्तांची भेट घेत या संदर्भात तक्रार दाखल केली आहे. तसेच निवडणूक आयोगाने संबंधित प्रकरणावर तातडीने पावले उचलत पालिका आयुक्तांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी 30 डिसेंबर हा अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस होता. याच दिवशी कुलाबा विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक



225, 226 आणि 227 मधून राहुल नार्वेकर यांचे नातेवाईक, बंधू मकरंद नार्वेकर, बहीण गौरवी शिवलकर आणि वहिनी हर्षदा नार्वेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. या अर्ज प्रक्रियेदरम्यान राहुल नार्वेकर स्वतः उपस्थित होते. याच उपस्थितीवरून वादाला तोंड फुटले आहे. इतर राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आरोप केला आहे की, नार्वेकर यांच्या उपस्थितीमुळे दबावाचे वातावरण निर्माण झाले आणि काही उमेदवारांना अर्ज भरण्यापासून रोखण्यात आले.दरम्यान, निवडणूक आयोगाचा अहवाल काय निष्कर्ष काढतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. जर तक्रारींमध्ये तथ्य आढळले, तर निवडणूक प्रक्रियेतील गंभीर उल्लंघन म्हणून कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, आरोप निराधार ठरल्यास विरोधकांच्या राजकीय डावपेचांवरही प्रश्न उपस्थित होतील. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत हे प्रकरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत असून, पुढील काही दिवसांत या वादावर निर्णायक घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

## आधी 2000, आता 500; RBI कडून मार्च 2026 पर्यंत नोटांचा वापर बंद होणार?

दिव्य वतन /वृत्तसेवा

नवी दिल्ली: सध्या सोशल मीडियावर 500 रुपयांच्या नोटा बंद होणार असल्याची पोस्ट शेअर केली जात आहे. मात्र, सरकारने या अफवांना पूर्णपणे फेटाळून लावले आहे. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो (PIB) ने एक फॅक्ट-चेक रिपोर्ट जारी करून स्पष्ट केले आहे की, भारतीय रिझर्व्ह बँक ( RBI ) ने मार्च 2026 पर्यंत ₹500 च्या नोटा चलनातून बंद करण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नाही. ही बातमी पूर्णपणे खोटी असून, नागरिकांनी अशा दिशाभूल करणाऱ्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. 500 रुपयांच्या नोटा अजूनही पूर्णपणे वैध आहेत आणि कोणत्याही व्यवहारात त्या वापरल्या जाऊ शकतात.

PIB ने आपल्या अधिकृत X हँडलवरून या अफवांचे खंडन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, "काही सोशल मीडिया पोस्ट्समध्ये असा दावा केला जात आहे की भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) मार्च 2026 पर्यंत 500 रुपयांच्या नोटा चलनातून बंद करेल. PIBFactCheck: हा



दावा खोटा आहे! RBI ने अशी कोणतीही घोषणा केलेली नाही." PIB ने नागरिकांना विनंती केली आहे की, कोणतीही बातमी खरी मानण्यापूर्वी किंवा ती पुढे पाठवण्यापूर्वी तिची सत्यता पडताळून पाहावी. 500 रुपयांच्या नोटा बंद झालेल्या नाहीत आणि त्या अजूनही कायदेशीररित्या वैध आहेत.

अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी ऑगस्ट महिन्यात संसदेला माहिती दिली होती की, 500 रुपयांच्या नोटांचा पुरवठा बंद करण्याची कोणतीही योजना नाही. त्यांनी हे देखील स्पष्ट केले होते की, एटीएममधून 500 रुपयांच्या नोटांसोबतच 100 रुपये आणि 200 रुपयांच्या नोटा देखील मिळत राहतील. या विधानाने 500 रुपयांच्या नोटा परत घेण्याच्या अफवांना पूर्णपणे खोडून काढले होते.

## मनसेचे नगर येथील दोन उमेदवार कालपासून गायब

दिव्य वतन /वृत्तसेवा

अहिल्यानगर महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले मनसेचे 2 उमेदवार गुरुवारपासून गायब झालेत. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असताना त्यांचा अद्याप त्यांच्या कुटुंबीयांशी व पक्षनेत्यांशी कोणताही संपर्क झाला नाही. त्यामुळे ते कुठे गेले? व त्यांचा संपर्क का होत नाही? असा सवाल उपस्थित होत आहे.

68 सदस्यीय अहिल्यानगर महापालिकेसाठी येतत्या 15 तारखेला निवडणूक होणार आहे. त्यानंतर 16 तारखेला मतमोजणी होऊन निकाल घोषित होणार आहेत. अर्ज मागे घेण्याच्याप हिल्या दिवशी 28 उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यात आज पुन्हा अधिकची भर पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे 2 उमेदवार गुरुवारपासून बेपत्ता झालेत. ते कुठे गेलेत? याची कोणतीही माहिती त्यांच्या कुटुंबीयांना व नेत्यांना नाही.

## ठाकरे गट, शेकाप आणि काँग्रेसच्या सात उमेदवारांचे अर्ज मागे; पनवेलमध्ये भाजपचा एकतर्फी खेळ

दिव्य वतन /वृत्तसेवा

सातारा राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भाजपने बिनविरोध उमेदवार निवडून आणण्याची आक्रमक रणनीती यशस्वीपणे राबवली असल्याचे चित्र दिसत आहे. कल्याण-डोंबिवलीनंतर ठाणे, भिवंडी, अहिल्यानगर आणि आता पनवेल महानगरपालिकेतही भाजपने मोठी आघाडी घेतली आहे. पनवेल महापालिका निवडणुकीसाठी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशीच महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला असून सात उमेदवारांनी माघार घेतल्याने भाजपचे एकूण आठ उमेदवार बिनविरोध विजयी ठरले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष मतदान होण्यापूर्वीच पनवेलमध्ये भाजपने सत्ता स्थापनेच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकल्याचे स्पष्ट झाले आहे.




पनवेलमध्ये भाजपचा पहिला बिनविरोध विजय प्रभाग क्रमांक 18 (ब) मधून नोंदवण्यात आला. भाजपचे उमेदवार नितीन पाटील यांची येथे बिनविरोध निवड झाली. शेतकरी कामगार पक्षाच्या नगरसेवकाचा अर्ज छाननी प्रक्रियेत बाद झाल्याने नितीन पाटील यांचा मार्ग मोकळा झाला आणि पनवेल महापालिकेसाठी मतदानाआधीच भाजपचा पहिला नगरसेवक निश्चित झाला. हा विजय भाजपसाठी प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात असून, त्यानंतर अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी राजकीय घडामोडींना वेग आला.

अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी शिवसेना ठाकरे गट, शेतकरी कामगार पक्ष आणि काँग्रेसच्या सात उमेदवारांनी आपले

अर्ज मागे घेतले. यामुळे भाजपचे आणखी सात उमेदवार बिनविरोध झाले आणि एकूण बिनविरोध जागांची संख्या आठवर पोहोचली. या सर्व जागांवर महायुतीचे उमेदवार निर्विवाद विजयी ठरले असून, केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे. बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये नितीन पाटील यांच्यासह रुचिता लोंढे, अजय बहिरा, दर्शना भोईर, प्रियंका कांडपिळे, ममता प्रितम म्हात्रे आणि स्नेहल ढमाले यांचा समावेश आहे. या घडामोडींमुळे पनवेलमध्ये महाविकास आघाडीची मोठी पीछेहाट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.पनवेल महापालिकेवर 2017 साली भाजपने एकहाती सत्ता स्थापन केली होती. त्या वेळी 78 पैकी 51 नगरसेवक भाजपचे निवडून आले होते. शेकापने 23 जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादीला प्रत्येकी दोन जागांवर समाधान मानावे लागले होते.

## साहित्य संमेलनाच्या नावाखाली पैशाची उधळपट्टी

### प्रागतिक साहित्य पंचायतीचे संमेलन स्थळीच धरणे आंदोलन

दिव्य वतन /वृत्तसेवा

सातारा0 राज्य शासनाने शेतकऱ्यांचे दोन कोटी रुपये साहित्य संमेलनाला देऊ नयेत , तसेच या संमेलनाचे अध्यक्ष हे भ्रष्ट व वांग्मय चोरी करणारे आहेत , साहित्य संमेलनाच्या नावाखाली पैशाची उधळपट्टी सुरू आहे म्हणून ती थांबवावी या मागणीसाठी प्रागतिक साहित्य पंचायत महाराष्ट्राच्या वतीने संमेलन स्थळाच्या प्रवेशद्वारासमोरच आज सलग दुसऱ्या दिवशी धरणे आंदोलन करण्यात आले मात्र दुपारी दोन नंतर पोलिसांनी त्यांना तिथून उठवले.

99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला हे धंदे आंदोलन दुसऱ्या दिवशीही




करण्यात आले.

शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायला पैसे नाहीत आणि या साहित्याची जत्रा मराठी भाषेला किती उपयोगी हा खरा प्रश्न आहे म्हणूनच आम्ही हे धरणे आंदोलन करून लक्षवेध करत आहोत असे आंदोलकांच्या वतीने सांगण्यात आले.

आंदोलकांमध्ये आभरानकार पार्थ पोळके , शिवाजी राऊत , गणेश कारंडे , असलम तडसरकर , विजय निकम , सचिन जाधव , अरविंद गाडे हे सहभागी झाले होते.

## महत्त्वाचे...



### संभाजीनगरमध्ये अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्याला नागरिकांचा चोप

संभाजीनगर - शहरातील हडको परिसरात एका अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्या व्यक्तीला नागरिक आणि राजकीय कार्यकर्त्यांनी बेदम चोप दिल्याची घटना गुरुवारी (१ जानेवारी) दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून पोलिसांनी संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले आहे.

हडको भागात दुपारी २ च्या सुमारास छेडछाडीचा प्रकार घडल्यानंतर राजकीय कार्यकर्ते रमेश इधाटे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या वेळी संतप्त झालेले नागरिक आणि कार्यकर्त्यांनी संबंधित व्यक्तीला पकडून जाब विचारत चोप दिला. अशा प्रवृत्तींना जरब बसावी यासाठी सार्वजनिकरीत्या त्या व्यक्तीकडून पीडित मुलीची माफी मागायला लावून त्याचे तोंड काळे करण्यात आले.रमेश इधाटे यांनी या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला असून तो शहरात मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. घटनेची माहिती मिळताच सिडको पोलिसांनी तातडीने धाव घेत संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतले.

### निवडणुकीत जादूटोण्याचा आरोप, पराभवाचं कारण अंधश्रद्धा?



छत्रपती संभाजीनगर -राज्यात सुरू असलेल्या महापालिका आणि नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजब-अद्भुत प्रकार समोर येत आहेत. प्रचार, आरोप-प्रत्यारोप आणि बंडखोरी यासोबतच आता अंधश्रद्धा आणि जादूटोण्याच्या आरोपांनी निवडणूक प्रक्रियेला वेगळंच वळण दिलं आहे. राज्यातील विविध भागांत उमेदवारांच्या वापरातील वस्तू, पूजासाहित्य किंवा संशयास्पद वस्तू आढळून आल्याच्या घटना समोर आल्या होत्या. काही ठिकाणी याला थेट जादूटोणा असल्याचं संबोधण्यात आलं. अशाच एका गंभीर प्रकरणामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली असून, शिवसेनेच्या एका पराभूत उमेदवाराने आपल्या पराभवामागे थेट जादूटोणा कारणीभूत असल्याचा आरोप केला आहे.

## महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीचीच सक्ती: फडणवीसांची सारस्वतांच्या मेळ्यात स्पष्टोक्ती; साहित्य संमेलनाचे केले उद्घाटन

दिव्य वतन /वृत्तसेवा

सातारा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीचीच सक्ती असल्याचा पुनरुच्चार केला. महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीचीच सक्ती आहे. इतर कोणत्याही भाषेची सक्ती नाही. पण इंग्रजी, फ्रेन्च व स्पॅनिश सारख्या परदेशी भाषांना पायघड्या घालायच्या आणि इतर भारतीय भाषांना विरोध करायचा हे योग्य नाही. सर्व भाषांचा सन्मान झाला पाहिजे. पण मातृभाषेचा सन्मान त्याहून अधिक झाला पाहिजे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना त्यांनी भाषा वाद, राजकारण, मराठी संस्कृती आदी विविध विषयांना हात घालत महाराष्ट्रात केवळ मराठीचीच सक्ती असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, आता नुकताच या ठिकाणी मावळत्या संमेलन अध्यक्षांनी नव्या अध्यक्षांना पदभार सोपवला. किती चांगला हा कार्यक्रम झाला. त्यांनी यांच्या हाती राज्य सोपवले. त्यांनी ते स्वीकारले. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. असे राजकारणातही झाले तर किती चांगले होईल. किमान साहित्य क्षेत्रात तरी अजून होत आहे ही चांगली गोष्ट आहे. हे असेच होत रहावे अशी माझी अपेक्षा आहे.

स्वराज्याच्या भूमी असलेल्या या सातारा नगरीत हे साहित्य संमेलन होत आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. आपण सर्वजण साहित्याचे सेवेकरी आहोत. हा सेवेचा भाग खऱ्या अर्थाने या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पुन्हा एकाद उजळून निघतो आणि आपल्या सर्वांना ही सेवा अविरत चालली पाहिजे अशी प्रेरणा आपल्याला मिळते.

सातारा हा संगमांचा प्रदेश

मुख्यमंत्री म्हणाले, सातारा केवळ भौगोलिक प्रदेश नाही. हा संगमाचाही प्रदेश आहे. हरीपूरला वारणा व कृष्णेचा संगम होतो. योगायोग कसा आहे पाहा, वारणा काठचे विश्वास पाटील या संमेलनाचे अध्यक्ष झाले. त्यांना अध्यक्षपदाचा पदभार कृष्णा काठच्या ताराबाई भवाळकर यांनी दिला. हा अनोखा संगम आपल्याला या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पहायला मिळाला. हा संगम एकप्रकारे परंपरा व आधुनिकतेचा संगम आहे. अनुभव व विचारांचा संगम आहे. इतिहासाचा व वर्तमानाचा संगम आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने अशा प्रकारचा संगम हीच आपल्या संस्कृतीची ओळख देखील आहे. आध्यात्म, तत्वज्ञान व सामाजिक जीवनात संगम हेच आपल्या संस्कृतीचे ब्रिदवाक्य राहिले आहे.

त्यामुळे जगातील जेवढी आक्रमणे झाली, ती सगळी आक्रमणे पचवत त्या - त्या आक्रात्यांच्या संस्कृतीतील जे चांगले आहे, ते या ठिकाणी अनुसरून आपली संस्कडृती अबाधित ठेवण्याचे काम केले. ज्या प्रकारे कोयना कृष्णेस मिळते, वारणा कृष्णेस मिळते, यमुना गंगेत मिळते अशा वेगवेगळ्या नद्या मिळून शेवटी एका नदीचे पात्र तयार होते. त्याच प्रकारे विचारांची आपली संस्कृती ती त्या एका नदीसारखी आहे. त्यात विविध प्रकारचे विचार. अनेकदा




परस्परविरोधी विचारही व्यक्त होत असतात. पण या सर्व विचारांच्या मंथनातून एक नदीचा असा प्रवाह तयार होतो की जो संस्कृती म्हणून साहित्य म्हणून आपल्या जाणिवा समृद्ध करतो. जो साहित्य व संस्कृती म्हणून आपल्या विचारांना प्रगल्भ करतो. त्यामुळे ही परंपरा आपल्या मराठी साहित्याने, साहित्य संमेलनांनी, मराठी भाषेने व मराठी भाषेतल्या सारस्वतांनी जपलेली आहे. ती अत्यंत महत्त्वाची आहे.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, साताऱ्याने सर्वाधिक 6 साहित्य संमेलने भरवली. सर्वाधिक 17 अध्यक्षही साताऱ्यानेच दिले. म्हणजे विक्रमही आहे व पराक्रमही आहे. एका दुर्गाबाई भागवत म्हणाल्या होत्या की, आशय व विषय या दोन भिन्न गोष्टी आहेत.

## महत्त्वाचे...

1,972 बघोटाळ्याचा 2 जानेवारीला अहवाल



शारदा कॉन्व्हेंट का कराटे चॅम्पियनशिप मे उत्कृष्ट प्रदर्शन.

नागपुरः ऑल स्पोर्ट्स कराटे एसोसिएशन नागपुर एवं एम्पायर इंटरनेशनल कराटे एसोसिएशन नागपुर के संयुक्त तत्वावधान में आयोजित नागपुर डिस्ट्रिक्ट कराटे चैंपियनशिप 2025 में माँ शारदा कॉन्वेंट के विद्यार्थियों ने उत्कृष्ट प्रदर्शन कर विद्यालय का नाम रोशन किया।

प्रतियोगिता में डेविड कटरे ने शानदार खेल का प्रदर्शन करते हुए प्रथम स्थान (1st Rank) प्राप्त किया। वहीं नमन पटले ने द्वितीय स्थान (2nd Rank) तथा अनुराग मौर्य ने द्वितीय स्थान ((2nd Rank) हासिल कर विद्यालय को गौरवान्वित किया। इस अवसर पर विद्यालय के संचालक श्री गजानन धूडस एवं प्राचार्या श्रीमती प्रीति धूडस ने सभी विजेता विद्यार्थियों को बधाई दी। उन्होंने कहा कि बच्चों के सर्वांगीण विकास के लिए खेल गतिविधियां अत्यंत आवश्यक हैं। विद्यालय द्वारा निरंतर विद्यार्थियों को खेलों के प्रति प्रोत्साहित किया जाता है तथा उन्हें बेहतर प्रशिक्षण, मार्गदर्शन और मंच उपलब्ध कराया जाता है।

विद्यार्थियों की इस सफलता में कोच श्री शेखर धुदस का विशेष योगदान रहा। प्रेरणादायक मार्गदर्शन के कारण ही विद्यार्थियों ने प्रतियोगिता में उत्कृष्ट प्रदर्शन किया।विद्यालय प्रबंधन के सतत प्रयासों और शिक्षकों के सहयोग से विद्यार्थियों ने यह सफलता प्राप्त की। इस उपलब्धि पर अभिभावकों ने भी हर्ष व्यक्त किया और विद्यालय के प्रयासों की सराहना की।

# स्व. भानुताई गडकरी डायग्नोस्टिक सेंटरमध्ये सोनोग्राफी मशीनचे लोकार्पण

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



नागपूर - केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या स्व. भानुताई गडकरी मेमोरिअल डायग्नोस्टिक सेंटरमध्ये शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी सोनोग्राफी मशीनचे लोकार्पण करण्यात आले. अंकुर सिड्सच्या सौजन्याने उपलब्ध झालेल्या या सुविधेचे उद्घाटन अंकुर सिड्सचे अध्यक्ष रवी काशीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ना. श्री. नितीन गडकरी, सौ. कांचन गडकरी, अंकुर सिड्सचे व्यवस्थापकीय संचालक माधवराव शेंबेकर, संचालक मकरंद सावजी, संचालक दिलीप रोडी, विजयी भारत संस्थेचे सचिव प्रभाकर येवले, प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. संजीव चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. २७ जुलै २०२५ ला डायग्नोस्टिक सेंटरचे उद्घाटन झाल्यानंतर सर्वसामान्य, गरीब कुटुंबातील रुग्णांना एमआरआय, सिटी स्कॅन, डायलिसीस, एक्स-रे, पॅथॉलॉजी, जनेरिक औषधांच्या सुविधांचा जवळपास दहा हजार रुग्णांनी लाभ घेतला. यामध्ये आता सोनोग्राफीच्या सुविधेची देखील भर पडली आहे. अत्याधुनिक व स्वदेशी असलेल्या या मशीनद्वारे तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने गुणवत्तापूर्ण चाचण्या होणार आहेत. ही सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध होणार आहे. रवी काशीकर यांनी याबाबत समाधान व्यक्त केले. ना. श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात योगदान देता आले, याचा आनंद असल्याची भावना व्यक्त केली. ना. श्री. गडकरी यांनी यावेळी अंकुर सिड्सच्या व्यवस्थापनाचे आभार मानताना अधिकाधिक गरीब रुग्णांना या सुविधेचा लाभ देण्याचा प्रयत्न असेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी प्रतिमा रोडी, सारंग गडकरी, मधुरा गडकरी, अविनाश घुशे, अतुल मंडलेकर, प्रकाश टेकाडे, हेमंत गडकरी, दिलीप धोटे, संजय टेकाडे, दर्शन पांडे यांच्यासह स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. मनीष केडिया, डॉ. पराग मुन, डॉ. बंसल, डॉ.






आस्था खेमका, डॉ. रोहित बडगे, डॉ. अभिजित ढवळे यांचा ना. श्री. गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. श्रीरंग वराडपांडे यांनी केले.

# विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची प्रधान सचिवपदी पदोन्नती






दिव्य वतन / प्रतिनिधी प्सिनिधी

नागपूर : विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची आज प्रधान सचिव म्हणून सध्याच्याच नागपूर विभागीय आयुक्त पदावर स्थानापन्न पदोन्नती देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्हि.राधा यांच्या स्वाक्षरीने निघालेल्या शासकीय आदेशात विजयलक्ष्मी बिदरी यांचे सध्याचेपद भारतीय प्रशासन सेवेच्या प्रधान सचिव श्रेणीत उन्नत करून सध्याच्याच पदावर स्थानापन्न पदोन्नती देण्यात आल्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

# प्रांतीय राज्यपालांची लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाला भेट देऊन माजी अध्यक्षांचा सन्मान

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : रविवार, २८ डिसेंबर रोजी नुकत्याच झालेल्या कार्यक्रमांत प्रांतीय राज्यपालांची लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाला भेट दिली आणि लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाच्या माजी अध्यक्षांचा सन्मान कार्यक्रम सदर नागपूर येथील हॉटेल कोणार्क द आर्क (हॉटेल एलबी) येथे आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुण्यांमध्ये प्रांतीय राज्यपाल एम. जे. एफ.भरत बालगड, द्वितीय उपप्रांतीय राज्यपाल एम. जे. एफ. डॉ. अरुण चतुर्वेदी आणि झोन अध्यक्ष एम.जे.एफ.डॉ.सतीश राणे यांचा समावेश होता. अध्यक्ष डॉ. भावना भलमे यांनी अध्यक्षांचा ठराव आणि क्लबची प्रस्तावना सादर केली. सचिव डॉ. नकुल मरकम यांनी उपस्थितांना सचिवांचे भाषण सादर केले. कोषाध्यक्ष ला. सोनल त्रिवेदी यांनी क्लबचे लेखाजोखा सादर केले. प्रांतीय राज्यपाल एम.जे.एफ. भरत बालगड यांनी क्लबच्या कार्याचे कौतुक केले आणि मार्गदर्शन केले. द्वितीय उपप्रांतीय राज्यपाल एम.जे.एफ. डॉ.अरुण चतुर्वेदी यांनी बैठकीचे मार्गदर्शन केले. झोन चेअरपरसन एम.जे.एफ. डॉ. सतीश राणे यांनी बैठकीचे मार्गदर्शन केले. डिसेंबर




हा ग्रँड पास्ट प्रेसिडेंट फेलिसिटेशन मंथ म्हणून ओळखला जातो. या प्रसंगी लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाच्या सर्व २१ माजी अध्यक्षांचा शाल आणि नारळ देऊन सत्कार करण्यात आला. संचालन डॉ. संजय थेटेरे यांनी केले तर आभार सचिव डॉ. नकुल मरकाम यांनी मानले. अशी माहिती लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाचे प्रशासक डॉ. मंगेश भलमे यांनी दिली.

# वर्ल्ड पार्लमेंटकडून पर्यावरण प्रेमींचा सत्कार

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

श्रीरामपूर : - वर्ल्ड पार्लमेंटच्या वतीने श्रीरामपूर पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पर्यावरणप्रेमींना वर्ल्ड पार्लमेंट एमिझरी अवॉर्ड २०२५ पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच इतरही क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या व्यक्तींना मा. श्री. शिवाजी राजेजाधव यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर सरदार संताजीराजे राजेघोरपडे यांचे वंशज मा. श्री. संजयकुमार राजेघोरपडे उपस्थित होते.वर्ल्ड पार्लमेंट हि जागतिक संस्था आपल्या लौकीकाप्रमाणे जागतिक पातळीवर सातत्याने सामाजिक, पर्यावरण व कायदे क्षेत्रात कार्यरत आहेच परंतु शब्दशः आपल्या तत्त्व प्रणाली प्रमाणेच काम करते हे सिध्द झाले, असे प्रतिपादनमा. श्री. शिवाजी दत्तात्रय राजेजाधव, शिंदखेडराजा, राजेलखुजीराव जाधवराव, छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाऊ माँसाहेब यांचे माहेरचे वंशज यांनी व्यक्त केले. ते श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या वर्ल्ड पार्लमेंट सन्मान सोहळ्यात विशेष अतिथी म्हणून बोलत होते.

पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पर्यावरण प्रेमींना वर्ल्ड पार्लमेंट एमिझरी अवॉर्ड २०२५ देऊन गौरविण्यात आले त्यात श्री. काळूराम पांडुरंग लांडगे -पर्यावरण क्षेत्( पुणे). डॉ. दिनकर श्रीधर पतंगे -पर्यावरण क्षेत्र (जत, सांगली). वजीर जमादार शेख -पर्यावरण क्षेत्र (पाडळी, पाथर्डी).

वर्ल्ड पार्लमेंटच्या वतीने पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पर्यावरणप्रेमींना वर्ल्ड पार्लमेंट एमिझरी अवॉर्ड २०२५ पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच इतरही क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या व्यक्तींना मा. श्री. शिवाजी राजेजाधव यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.सदर कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींना वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड देऊन सन्मानीत करण्यात आले त्यामध्ये कॅप्टन नरेंद्र कुमार सिद्धू (निवृत्त) - क्रीडा व साहित्य (मेरठ). श्री. उल्हास बाबाराव देशमुख -क्रीडा, शिक्षण, पर्यावरण, सामाजिक कार्य, कला व अभिनय (अकोला). डॉ. संतोष दामोदर पेठे-शिक्षण, साहित्य, पर्यावरण व सामाजिक कार्य (अकोला). डॉ. संजय रघुनाथ भराटे -आदर्श प्राध्यापक, शिक्षण व साहित्य(पाथर्डी). डॉ. सुभाष भगवानराव देशमुख -शिक्षण, साहित्य व सामाजिक कार्य (पाथर्डी). डॉ. सुभाष जगन्नाथ देशमुख - अर्थशास्त्र व शिक्षण (पाथर्डी).डॉ. रोहन प्रदीप पाटील - सामाजिक सेवा (करमाळा). श्री. नितेश विश्वनाथ देवघरकर- चित्रकला व पेंटिंग( पोलादपूर, रायगड ). कु. आशा भानुदास पालवे




- सामाजिक कार्य, (अहिल्यानगर). प्रा. डॉ. सुधीर नरसिंगदास अग्रवाल -शिक्षण, साहित्य, पत्रकारिता व सामाजिक कार्य- (वर्धा). मिलिंद भारतराव लांडे -शिक्षण, क्रीडा व सामाजिक कार्य (अकोला). संजयकुमार रंगनाथ राजेघोरपडे - शिक्षण, आरोग्य व सामाजिक कार्य (करमाळा, सोलापूर). डॉ. शंकर रामदास अंदानी (सी.ए) -अर्थशास्त्र, शिक्षण, सोशल वर्क (अहिल्यानगर). श्री. राजेंद्र शंकरराव घोडके- सामाजिक कार्य (अहिल्यानगर).सौ. संजीवनी काळे- शिक्षण, साहित्य व समाजकार्य (अमरावती). बहिरू गभाले- शिक्षण, पर्यावरण व सामाजिक कार्य (करमाळा). यांचा समावेश आहे.

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर सरदार संताजीराजे राजेघोरपडे यांचे वंशज मा. श्री. संजयकुमार राजेघोरपडे उपस्थित होते. त्यांनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वर्ल्ड पार्लमेंटच्या माध्यमातून कार्य करणारे डब्ल्यूसीपीएचे महाराष्ट्र चॅप्टर अध्यक्ष डॉ. दत्ता विघावे यांचे कौतुक केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून जेष्ठ कृषीतज्ञ डॉ. दिनकर श्रीधर पतंगे यांनी पर्यावरणाचे महत्व पटवून देताना वर्ल्ड पार्टमेंटच्या सर्वच उपक्रमांचे कौतुक केले. महाराष्ट्र शासनाच्या संपादकीय मंडळाचे कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे यांनीही वर्ल्ड पार्लमेंट विषयी असलेल्या चांगल्या अनुभवांना उजाळा दिला. सोलापूर जिल्हा शिक्षक संघटनेचे मा.श्री किसन बबन कांबळे यांनी भारतीय संविधानाविषयी उपस्थितांना विस्तृत ज्ञान दिले. जेष्ठ अर्थतज्ञ मा. श्री. शंकर अंदानी, सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. दत्तात्रय डोंगरे, डॉ. सुभाष देशमुख, विठ्ठलराव सोनवणे, अमोल जाधव, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

वर्ल्ड कॉन्स्टीट्यूशन अँड पार्लमेंट असोशिएशन अर्थात जागतिक संविधान व संसद संघाच्या महाराष्ट्र चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. दत्ता विघावे यांच्या संकल्पनेनुसार प्रथा बनल्याप्रमाणे कार्यक्रमाचे उदघाटन उपस्थितांच्या हस्ते भारतीय संस्कृतीत व आयुर्वेदात अनन्यसाधारण महत्व असलेल्या तुळशीला जलार्पण करून झाले. तसेच पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे अनावरण व वाटप करण्यात आले. त्याचबरोबर श्री साई विठ्ठल अनाथाश्रम गोखलेवाडीतील मुलांना उष्ण कपडे व आर्थिक मदत करण्यात आली. वर्ल्ड पार्लमेंटच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना नेहमी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देत असल्याबद्दल सर्वच उपस्थितांनी डॉ. दत्ता विघावे यांचे कौतुक केले.

डब्ल्यूसीपीएचे अध्यक्ष डॉ. दत्ता विघावे यांनी प्रास्ताविक संस्थेच्या कार्याचा परिचय व भविष्यातील योजनांची माहिती दिली. तर राजेंद्र घोडके यांनी आभार मानले. संस्थेचे वरिष्ठ सदस्य बाळासाहेब कोठुळे यांनी सर्वांगसुंदर सुत्रसंचलन केले तर प्रसिध्दी प्रमुख वजीरभाई शेख व कोषाध्यक्ष चिंतामन भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले.

वर्ल्ड कॉन्स्टिट्यूशन अँड पार्लमेंट असोसिएशन ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे जी पृथ्वीसाठी संविधान या संकल्पनेवर आधारित लोकशाही सरकारची स्थापना करण्यासाठी कार्यरत आहे ज्याचा उद्देश जागतिक शांतता आणि न्याय प्रस्थापित करणे आहे या संस्थेच्या अंतर्गत प्रोव्हिजनल वर्ल्ड पार्लमेंट नावाचे एक अस्थायी जागतिक संसद मंडळ आहे जे या संविधानाच्या तत्त्वांवर आधारित कायदे तयार करते आणि जागतिक प्रशासनाची पायाभूत सुविधा विकसित करण्याचे काम करते वर्ल्ड कॉन्स्टिट्यूशन अँड पार्लमेंटची स्थापना १९५८ मध्ये प्रोफेसर फिलिप इस्ली आणि मार्गारिटली यांनी केली.

# 1,972 बघोटाळ्याचा 2 जानेवारीला अहवाल

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

शेतरस्त्यांची उपलब्धता ही ग्रामीण अर्थकारणाला चालना देणारी - राज्यमंत्री ॲड.आशीष जयस्वाल

नागपूर, दि. 2 :- राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दुरदृष्टीतून ग्रामीण भागाला विशेषतः शेतक-यांच्या आर्थिक प्रगतीला सहाय्यभूत ठरणारी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना साकारण्यात आली आहे. या योजनेतून शेतक-यांना आपला शेतमाल बाजारपेठेत वेळेत पोहोचविता येईल. बारमाही शेतरस्त्यांची उपलब्धता ही ग्रामीण अर्थकारणाला चालना देणारी असून ही योजना राज्याच्या प्रत्येक ग्रामीण भागात प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता असून स्थानिक अधिका-यांनी दक्षता घेण्याचे प्रतिपादन वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशीष जयस्वाल यांनी केले. सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी जिल्हाधिकारी, डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह राज्यभरातील संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते. पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक वर्षांपासून शेतकरी पाणंद रस्त्यांच्या चिंतेत असतात. त्यांच्यासाठी रस्त्यांची सुविधा केवळ वाहतूकीपुरती मर्यादित नसून शेतमाल जर वेळेवर बाजारपेठेत पोहोचला तर त्याचे मिळणारे मोल हे त्यांच्या अर्थकारणाशी निगडीत असते. शेती व शेतक-यांच्या अर्थकारणाला गती देण्याच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्वाची असल्याचे वित्त राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यावेळी म्हणाले. ग्रामीण भागात शेवटच्या टोकावर उभ्या असलेल्या शेतक-यांपासून महानगराच्या विस्तारापर्यंत महसूल विभागाला आपली कर्तव्ये पार पाडावी लागतात. यात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही शेतक-यांच्या उज्वल भवितव्याला अधोरेखित करणारी असल्याने या कामातील गुणवत्ता ही त्या त्या भागातील भौगोलिक रचनेनुसार सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक अधिका-यांनी आपल्या भागात असलेला जमिनीचा पोत व पाणंद रस्त्याची मजबुती कशी गुणवत्तापूर्ण करता येईल याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. यासाठी गरजेप्रमाणे आवश्यक तेथे योग्य त्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याचे निर्देश अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी महसूल विभागातील वरिष्ठ अधिका-यांना दिले. त्यांनी दृरदृश्यप्रणालीद्वारे अधिका-यांना मार्गदर्शन केले.

शेती आणि शेतकऱ्यांना जोडणारा दुवा म्हणजे पाणंद रस्ता आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या योजनेची सखोल माहिती व्हावी, याची अंमलबजावणी करताना अधिका-यांच्या मनात कोणेतही संदेह राहू नयेत, या योजनेबाबत अकारण पत्रव्यवहार करण्यात वेळ जाऊ नये या दृष्टिकोनातून सारासार विचार करून हे प्रशिक्षण आपण आयोजित केल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या १४ डिसेंबर २०२५ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयाची सोपी व सुलभ पद्धतीने माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी केले. या कार्यशाळेस राज्यातील विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## काँग्रेस एकसंध, बंडखोरी नाही; 10 माजी नगरसेवकांसह 150 जणांनी माघार घेतली

नागपूरः नागपूरकरांच्या पाठिंब्याने Mission 100 नगरसेवक हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी काँग्रेसचे सर्व नेते व कार्यकर्ते एकसंध झाले असून नागपूर महानगरपालिका निवडणूक–२०२६ मध्ये आता कोणतीही बंडखोरी उरलेली नाही.आज १० माजी नगरसेवकांसह सुमारे १५० काँग्रेस नेत्यांनी आपले नामनिर्देशन अर्ज मागे घेतले असून, गेल्या १९ वर्षांनंतर भाजपला महानगरपालिकेतून सत्तेबाहेर काढून काँग्रेसला पुन्हा सत्तेत आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.नामनिर्देशन मागे घेणाऱ्या माजी नगरसेवकांमध्ये प्रभाग-२५चे पुरुषोत्तम हजारे, प्रभाग-१०च्या रश्मी उईके, प्रभाग-१२चे अरुण ढवरे, प्रभाग-१३चे अमर बागडे, प्रभाग-८च्या आशा उईके, प्रभाग-८चे जिशान मुमताज मोहम्मद इरफान अन्सारी तसेच प्रभाग-१९चे फरहान खान कुर्बान खान यांचा समावेश आहे.पदापेक्षा लोकसेवा व पक्षसेवा महत्त्वाची या भूमिकेतून ओवैस कादरी, पूजा मानमोडे, राजेश तिवारी, मुन्ना वर्मा, सुधाकर तोडसे, माया वानखेडे, फर्दिन गन्नी खान आदी लोकप्रिय काँग्रेस नेत्यांनीही आपले अर्ज मागे घेतले.तिकीट वाटपाच्या प्रक्रियेदरम्यानही काँग्रेसमध्ये पूर्ण एकता दिसून आली असून कोणताही वाद निर्माण झाला नाही.नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे, यांच्यासह उत्तर नागपूरचे आमदार नितीन राऊत, आमदार अभिजीत वंजारी, गिरीश पांडव, अतुल कोटेचा, प्रफुल्ल गुडधे पाटिल, बंटी शेलके तसेच इतर ज्येष्ठ व युवा काँग्रेस नेत्यांनी पक्षहितासाठी नामनिर्देशन अर्ज मागे घेतलेल्या सर्व नेते.

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा जिवंत वस्तुपाठ -प्रा. डॉ. प्रकाश बर्वे

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

काटोल - काही व्यक्ती आपल्या आयुष्यात केवळ एखाद्या प्रसंगापुरत्या भेटतात आणि नकळतपणे आपल्या मनाच्या घरात कायमची जागा करून बसतात. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे झालेल्या अनुवाद कार्यशाळेच्या निमित्ताने भेटलेले प्रा.डॉ. प्रकाश बर्वे हे अशाच माणसांपैकी एक. कार्यशाळा संपलीपण त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा सहवास आणि त्यांची आपुलकी मनात खोलवर रुतून राहिली.प्रा.डॉ.प्रकाश बर्वे म्हणजे माणूस म्हणून समृद्ध असण्याचा अर्थ.अत्यंत बोलके, संवादप्रिय, समोरच्याच्या डोळ्यात डोळे घालून विचारपूस करणारे, प्रत्येकाच्या सुखदुःखाशी आपुलकीने जोडले जाणारे हे व्यक्तिमत्त्व आहे. कोण भेटेल, कुठून आला, कसा आहे, जेवला की नाही, राहण्याची सोय झाली का ? ही विचारपूस औपचारिक नसून ती माणुसकीच्या मुळातून येते. इतरांची काळजी घेणे हा त्यांचा स्वभाव आहे आणि संवाद साधणे ही त्यांची सहज कला.कार्यशाळेदरम्यान आयोजक म्हणून त्यांनी घेतलेली जबाबदारी केवळ नियोजनापुरती मर्यादित नव्हती. प्रत्येक सहभागी व्यक्ती कम्फर्टे झोन मध्ये आहे का ? त्याला काही अडचण आहे का ? याकडे त्यांचे लक्ष होते. जेवण, निवास, वेळापत्रक, अतिथींची व्यवस्था सगळं काही अत्यंत नीटनेटके आणि मनापासून. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे, ते सगळं करताना त्यांच्या चेहऱ्यावर कुठेही थकवा नव्हता. उलट त्यांच्या विनोदी बुद्धीमुळे त्यांच्या सहज सुटणाऱ्या जोक्समुळे वातावरण नेहमीच प्रसन्न राहत होते. हसवणे ही त्यांची लकब नाही ती त्यांची देणगी आहे. प्रा. डॉ.प्रकाश बर्वे हे उत्कृष्ट लेखक आणि कुशल लेखनिक आहेत. शब्दांशी त्यांची मैत्री जुनी आहे. पुस्तकांच्या सहवासात राहणारा हा अवलिया केवळ वाचक नाही, तर 'माणसे वाचणारा' व्यक्ती आहे. वाचनातून माणूस कसा घडतो, विचार कसे समृद्ध होतात, संवेदना कशा परिपक्व होतात याचा जिवंत नमुना म्हणजे प्रा.डॉ. प्रकाश बर्वे. निसर्गप्रेम हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. पक्ष्यांचा अभ्यास, फुलं, फळं, भाज्यांविषयी असलेलं ज्ञान, त्यामागचा बारकावा पाहण्याचा दृष्टीकोन त्यांच्या निरीक्षणशक्तीची साक्ष देतो. निसर्गाशी असलेली ही नाळ त्यांना अधिक संवेदनशील बनवते. त्यांचे बालपण सुशिक्षित, सुसंस्कृत वातावरणात गेले. आई मुंबईचे व वडील नाशिकचे म्हणून त्यांचे बालपण आणि व्यक्तिमत्त्व शहरी वातावरणात आकाराले गेले. लहानपणी त्यांना मालती फुलदरे यांच्यासारख्या शिक्षिका लाभल्या. त्यांनी दिलेले वाचनाचे प्रोत्साहन त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले. त्या वाचनातून विचारांची बैठक मजबूत झाली आणि पुढे त्या विचारांनीच त्यांच्या आयुष्याचा प्रवास ठरवला. त्यांचे वडील शासकीय सेवेत होते. घरात शिक्षण, शिस्त आणि मूल्यांची पायाभरणी लहानपणापासूनच झाली. वडिलांचे आंबेडकरी विचारवंत रा.सू. गवळी यांच्याशी असलेले संबंध त्यातून मिळालेले सामाजिक




भान आणि प्रबोधनाची दिशा हे सारे संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वात खोलवर रुजलेले दिसतात. त्यामुळेच समाजाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी केवळ नोकरीपुरती मर्यादित न राहता माणुसकीकडे झुकलेली आहे. प्रा.डॉ.बर्वे यांनी आयुष्यात विविध शासकीय नोकऱ्यांमध्ये काम केले. जिल्हा परिषद, पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंहगड कॉलेज, विविध ग्रंथालये प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपली छाप सोडली. पोलीस आयुक्त प्रकाश पवार आणि डॉ.रवींद्र सिंघल यांच्यासोबत त्यांनी काम केले. आजोबा देखील पोलीस खात्यात असल्याने या क्षेत्राबद्दल त्यांना विशेष आकर्षण होते. मात्र कोणतेही पद असो भूमिका असो त्यांनी माणूसपण कधीच सोडले नाही.

# पत्नीच्या अनैतिक संबंधांचा संशय, अखेर दारुच्या नशेत पत्नीला संपवलं

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : चारित्र्यावर संशय घेत दारुड्या पतीने पत्नीला ठार केल्याची धक्कादायक घटना शहरात समोर आली आहे. ही थरारक घटना थर्टी फर्स्टच्या रात्री यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील किनखेडे लेआउट येथे घडली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी पतीला अटक केली.

नेमकं काय घडलं?

रामेश्वरी देवेंद्र मानेश्वर (वय 33) असं मृत महिलेचं नाव आहे. तर देवेंद्र मानेश्वर (वय 38) असं अटकेतील मारेकरी पतीचं नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, देवेंद्र हा मूळ बालाघाट येथील रहिवासी आहे. रामेश्वरी आणि त्याचं दोघांचं हे दुसरं लग्न आहे. रामेश्वरीचे आपल्या पत्नीचे एका नातेवाईकासोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय देवेंद्रला आला. त्यामुळे दारू पिऊन तो नेहमी तिच्याशी वाद घालायचा, तिला मारहाण करायचा.

बुधवारी सकाळी रामेश्वरीचा भाऊ रामकिशोर मधू पाचे (वय 35, रा. कावरापेठ) हा रामेश्वरीला भेटायला आला. देवेंद्रने मारहाण केल्याचं रामेश्वरीने रामकिशोरला सांगितलं होतं. 'माहेरी सोडून दे', असेही ती त्याला म्हणाली. 'उद्या बघू', असे म्हणत रामकिशोर तेथून निघाला.

त्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी रामेश्वरी माहेरी जाण्यासाठी हट्ट धरू लागली. पण पती देवेंद्रने तिला नकार दिला. त्यानंतर त्याने दारू पिण्यासाठी रामेश्वरीकडे पैसे मागितले. रामेश्वरीने पैसे देण्यास नकार दिला. पत्नीने नकार दिल्याने देवेंद्र संतापला. त्याने शिवीगाळ करत रामेश्वरीला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याने लाकडी काठीने रामेश्वरीच्या डोक्यावर वार केले. याच मारहाणीत तिचा मृत्यू झाला.

त्यानंतर रात्री 9.30 वाजताच्या सुमारास देवेंद्र रामकिशोरच्या घरी गेला. त्याने रामेश्वरी बेशुद्ध असल्याचं रामेश्वरीच्या भावाला सांगितलं. रामकिशोर आणि देवेंद्र तेथे गेले. रामेश्वरीला मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. पण डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केलं.



त्यानंतर रामेश्वरीच्या भावाने रामकिशोरने यशोधरानगर पोलिसांत हत्येची तक्रार दिली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून देवेंद्रला अटक केली आहे.

## वरंदळी येथे विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू

### आरोग्य केंद्रात डॉक्टर नसल्याने नातेवाईक संतप्त

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अमरावती : तालुक्यातील वरंदळी येथे घरात विद्युत धक्का लागून २२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास घडली. सचिन विठ्ठल राठोड (२२, रा. वरंदळी, ता. दिग्रस) असे मृतकाचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सचिन हा राहत्या घरात असताना अचानक ओरडण्याचा आवाज आला. त्यामुळे कुटुंबीयांनी धाव घेतली. त्यावेळी तो विद्युत वायरला चिकटलेला दिसून आला.

तत्काळ घरातील विद्युत पुरवठा बंद करून त्यास उपचारासाठी वसंतनगर प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र तेथील मुख्य गेट बंद असून, कोणताही वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हता. यानंतर तातडीने रुग्णवाहिका बोलावून त्यास दिग्रस ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून सचिन यास मृत घोषित केले. मृतकाच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ व एक बहीण असा परिवार आहे.

वरंदळीपासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर वसंतनगर प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तेथे आपत्कालीन रुग्णांवर उपचार होत नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणी मृतकाचे काका वंसता उत्तम राठोड यांच्या तक्रारीवरून दिग्रस पोलिस ठाण्यात कलम मर्ग दाखल करण्यात आला आहे. तरुण मुलांचा मृत्यू झाल्याने कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. वसंतनगर आरोग्य केंद्रात सुविधा उभारा : आडे यापूर्वीही विष प्राशन केलेल्या रुग्णावर डॉक्टर अनुपस्थितीमुळे उपचार होऊ शकले नव्हते. त्यामुळे १२ किलोमीटर अंतरावरील दिग्रस ग्रामीण रुग्णालयात रुग्ण नेण्यासाठी विलंब होत असून गंभीर अनर्थ घडत आहेत. वसंतनगर प्राथमिक आरोग्य केंद्रात तातडीने सुधारणा करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते धीरज आडे यांनी केली आहे.

## डॉ. देशमुख, पवार, बारहाते 'वॉल ऑफ फेम'चे मानकरी

### नववर्षाच्या पहिल्याच दिवशी उद्घाटन, संकल्पनेतील अभिनव योजना ठरली चर्चेचा विषय

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अमरावती : उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी नव्यानेच सुरु झालेल्या 'वॉल ऑफ फेम' चे पहिले मानकरी होण्याचा बहुमान डॉ. अमोल देशमुख, सतिश पवार व परिक्षीत बारहाते यांना मिळाला आहे. जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांच्या संकल्पनेतील या अभिनव योजनेचा शुभारंभ नववर्षाच्या पहिल्या दिवशी आज, १ जानेवारीला त्यांच्याच प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

त्यासाठी जिल्हा परिषदेच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात एक छोटेखानी समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यानच तिन्ही अधिकारी-कर्मचाऱ्यांच ी छायाचित्रे असलेल्या डीजीटल वॉलचे कळ दाबून विमोचन करण्यात आले. या वॉलवरील चित्रे महिनाभर तशीच राहणार असून या महिन्यातील उल्लेखनीय काम करणाऱ्या तिघांची पुढच्या महिण्याच्या पहिल्या आठवड्यात निवड करुन ते झळकविले जाणार आहेत. नवीन वर्षाचा संकल्प म्हणून जिल्हा परिषदेने हा उपक्रम सुरु केला आहे.

'वॉल ऑफ फेम'च्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व स्थायी, अस्थायी व कंत्राटी अधिकारी-कर्मचाऱ्यांन ा त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरवण्यात येणार आहे.

या सन्मानासाठी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांन ी त्यांच्या जॉबचार्टनुसार नेमून दिलेल्या कामात १०० टक्के उद्दिष्टपूर्ती केलेली असणे किंवा जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेली असणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, जिल्हा ग्रामीण विकास




यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिल्पा पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीराम कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) बाळासाहेब बायस, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) बाळासाहेब रायबोले, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, जल व मृद संधारण अधिकारी सुनील जाधव, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय घाणेकर, शिक्षणाधिकारी सतिश मुगल (प्राथमिक), कृषी विकास अधिकारी मल्ला तोडकर यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उल्लेखनीय कामगिरीचा सन्मान या उपक्रमांतर्गत पहिला सन्मान वरुडचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल देशमुख (गोल्डन कार्ड जनरेशन), सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ सहायक सतिश पवार (१०० टक्के ज्येष्ठता याद्या प्रसिद्धी) आणि पंचायत विभागातील वरिष्ठ सहायक परिक्षीत बारहाते (ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना विमा लाभ) यांना मिळाला. त्यांनी आपल्या क्षेत्रात नैपुण्यपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

## अतिवृष्टीमुळे नुकसान; अंतिम पैसेवारी ४८ पैसे दुष्काळ जाहीर होण्याचा मार्ग मोकळा

दिव्य वतन /प्रतिनिधी



अकोला यंदा अतिवृष्टीमुळे व संसतधार पावसामुळे खरीप हंगामातील पिके उद्धवस्त झाल्याचे जाहीर झालेल्या अंतीम पैसेवारीवर नजर टाकल्यास दिसून येते. जिल्ह्याची अंतीम पैसेवारी सरासरी ४८ पैसे जाहीर करण्यात आली आहे. यंदा खरीपाची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी जाहीर झाल्याने दुष्काळ जाहीर होण्याचा व पर्यायाने शेतकऱ्यांना सवलती मिळण्याचा मार्ग आणखी प्रशस्त झाला आहे. गतवर्षी उन्हाळ्यात अवकाळी पावसामुळे जूनच्या प्रारंभीही पाऊस पडेल, अशी शक्यता होती. मात्र तसे झाले नाही. अशातच जूनच्या अखेरीस पात्र जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. जुलै महिन्यात झालेल्या पावसामुळे, सोयाबीन, कापूस, तूर पिकांचे नुकसान झाले. सततच्या पावसामुळे सोयाबीनच्या पिकाला शेंगा न लागल्याचे प्रकार सुद्धा समोर आले. एकूण याचा परिणामी शेतमालाच्या उत्पादनावर झाला आहे. त्यानंतर ३१ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याची सुधारित पैसेवारी सरासरी ४८ पैसे जाहीर करण्यात आली. आता अंतीम पैसेवारी घोषित झाली आहे. ९९० गावातील स्थितीची करण्यात आली पाहणी पैसेवारी ५० टक्क्यांच्या खाली निघाल्यास पीक परिस्थिती गंभीर व ५० टक्क्यांच्यावर निघाल्यास पैसेवारीचे समीकरण आहे. जिल्ह्यात महसुली गावांची संख्या १०१२ आहेत. त्यातील ९९० गावे खरीप पिकांच्या लागवडी योग्य आहेत. त्यामुळे ९९० गावांमधील अंतीम पैसेवारी ४८ पैसे आली. तालुका गाव पैसेवारी अकोला १८१ ४९ अकोट १८५ ४८ तेल्हारा १०६ ४७ बाळापूर १०३ ४७ पातूर ९४ ४८ मूर्तिजापूर १६४ ४७ बार्शीटाकळी १५७ ४९

## प्रेमी युगुलाने रेल्वेखाली संपवले जीवन

### कसुरा गावाजवळ रेल्वेमार्गावर आढळले दोघांचे मृतदेह

दिव्य वतन /प्रतिनिधी

शेळद (ता. बाळापूर) गावातील एका प्रेमी युगुलाने त्यांच्या लग्नाला कुटुंबाच्या टोकाच्या विरोधामुळे मृत्यूला कवटाळल्याची घटना घडली. बुधवारी कसुरा गावाजवळील रेल्वेमार्गावर या दोघांचे मृतदेह आढळले. थर्टीफर्स्टला सर्वत्र नववर्षाच्या स्वागताचा जल्लोष सुरू असताना ही हृदयद्रावक घटना समोर आली.



अक्षय सुरेश थारकर (३२) आणि २४ वर्षीय तरूणी दोघेही शेळद परिसरातील रहिवासी होते. अक्षय हा वाहन चालक होता, तर तरुणी अंत्री येथील एका इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होती. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचे प्रेमसंबंध होते आणि त्यांना विवाह करून संसार थाटायचा होता. मात्र, त्यांच्या या नात्याला दोन्ही कुटुंबांकडून प्रचंड विरोध होता. घरच्यांच्या या विरोधामुळे दोघेही मानसिक तणावाखाली होते. शेवटी या विरोधाला कंटाळून त्यांनी रेल्वेखाली धाव घेत आपले जीवन संपवल्याची चर्चा शेळद परिसरात होती.

स्थानिकांना रेल्वेमार्गालगत मृतदेह दिसल्यानंतर त्यांनी तातडीने उरळ पोलिसांना याची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून उरळ पोलिस ठाण्याचे ठाणेदार पंकज कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश कायंदे आणि त्यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात पाठवले. या दोन्ही मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले आहे.

मनमिळावू आणि कष्टाळू असलेल्या या तरुणांनी अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

उरळ पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, नातेवाईक आणि मित्रपरिवाराचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस करत आहेत.

## शिंदे सेना, बसपच्या प्रत्येकी एका उमेदवारासह १७ जणांची माघार

### माजी उपमहापौर राजेंद्र गिरी, १३ अपक्षांचेही उमेदवारी अर्ज मागे

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला : महापालिका निवडणुकीसाठी दाखल उमेदवारी अर्जांच्या बुधवारी झालेल्या छाननीनंतर गुरुवारी उमेदवारी अर्ज माघारीच्या गुरुवारी पहिल्या दिवशी शिवसेना,बहुजन समाज पक्षाच्या प्रत्येकी एका उमेदवाराने आणि १३ अपक्षांसह १७ उमेदवारांनी माघार घेतली. यात दोन उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या दोन उमेदवारांचा प्रत्येकी एक अर्ज मागे घेण्यात आला. तर त्यांचा प्रत्येकी एक अर्ज कायम आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत शुक्रवार, २ जानेवारी असून सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. त्यामुळे येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रत्यक्ष निवडणूक लढवण्यासाठी किती उमेदवार रिंगणात असतील हे चित्र स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक ५ डमधून चेतन आत्माराम जळमकार यांनी शिवसेनेतर्फे (शिंदे गट) भरलेला उमेदवारी अर्ज मागे घेतला, अशी माहिती झोन क्रमांक ३ चे निवडणूक निर्णय अधिकारी शरद जावळे यांनी दिली. जळमकर यांनी तीन अर्ज दाखल केले होते. परंतु शिवसेना पक्षाचा अधिकृत उमेदवारी अर्ज त्यांनी मागे घेतला असल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर लेखी दिले आहे.

या प्रभागात अन्य स्पर्धक पक्षांकडून त्यांचा भाऊ निवडणूक लढवत असल्याने त्यांनी माघार घेतल्याची चर्चा आहे. अर्ज माघारीनंतर त्यांनी आपला मोबाइल स्वीच ऑफ केल्याचे पक्षाच्या काही विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात आले. याबाबत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्रीरंग पिंजरकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, जळमकर या उमेदवाराशी संपर्क होऊ शकत नाही. याबाबत आम्ही उद्या सांगू शकू.

गुरुवारी १७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. झोन क्रमांक १ मधून एका अपक्ष उमेदवाराने आज माघार घेतली, असे निवडणूक निर्णय अधिकारी मनोज लोणारकर यांनी सांगितले. झोन २ मधून प्रभाग क्रमांक ३ क- उमेश हिरालाल श्रीवास्तव, प्रभाग ४ अ-चोपडे मंगला प्रवीण, प्रभाग




४ ब जया नरेंद्र दिंडोकार, प्रभाग ५ डमधून चेतन आत्माराम जळमकार यांनी उमेदवारी मागे घेतली.

प्रभाग ६ ब- राजेंद्र आनंद गिरी, झोन क्रमांक ३ मधून प्रभाग १७ अ- सरिता संतोष सोळंके, प्रभाग ४ अ- राहुल गणेराव वानखडे, प्रभाग १० ड- नीलेश दामोधरराव वानखडे, प्रभाग ९ ड- शरजील अनिस अहमद हसन, प्रभाग ८ क- शाहिस्ता परवीन जावेद रहमान खान, झोन क्रमांक ४ मधून प्रभाग ११ अ- शेख इब्राहिम शेख कासम, झोन क्रमांक ५ मधून प्रभाग १४ क- मुरूमकार वैभव जगदीश, प्रभाग १३ क अंजली पंकजराव देशमुख, प्रभाग १३ ब- मुरमकार पूजा कपिल, प्रभाग १९ अ- पळसपगार पंकज, प्रभाग १९ ब- पवार दिनेश प्रल्हाद असे १७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले.

झोन क्रमांक मागे घेतलेले अर्ज १. (प्रभाग १,२,७) १ २ (प्रभाग ३,४,४,६) ५ ३(प्रभाग ८,९,१०,१७) ५ ४ (प्रभाग ११,१२,१८) १ ५ (प्रभाग १३,१४,१५) ३ ६ (प्रभाग १६,१९,२०) २

## महत्त्वाचे...

### जिल्हा परिषदांच्या निवडणुकांची तयारी जवळपास अंतिम टप्प्यात

बुलडाणा : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. निवडणुकांच्या तारखा निश्चित करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ६ आणि ७ जानेवारी रोजी महत्त्वाची बैठक बोलावली आहे. जिल्हा परिषद निवडणुकांसाठी आवश्यक असलेल्या ईव्हीएम उपलब्ध असल्याची माहिती निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी दिली आहे. मात्र, सध्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये गुंतलेले मनुष्यबळ मोकळे झाल्यानंतरच जिल्हा परिषदांसाठी मतदानाची प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे मतदानाच्या अंतिम तारखांवर आयोगाच्या बैठकीत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.या बैठकीला जिल्हा परिषदांचे संबंधित अधिकारी तसेच पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. निवडणूक प्रक्रियेतील कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. ओबीसी आरक्षणासंदर्भातील निर्णयामुळे राज्यातील केवळ १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांमध्येच निवडणुकीचा मार्ग मोकळा आहे. ज्या ठिकाणी ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली गेली आहे, तेथे इतर समाजघटकांवर अन्याय होऊ नये म्हणून निवडणुका स्थगित ठेवण्यात आल्या आहेत.जिल्हा परिषद निवडणुकांचे मतदान २५ जानेवारीच्या आसपास होण्याची दाट शक्यता आहे. आचारसंहितेचा कालावधी लक्षात घेऊन मतदानाच्या तारखा ठरवण्यात येणार असून, २५ जानेवारी ही तारीख अडचणीची ठरल्यास २८ जानेवारी रोजी मतदान घेण्याचाही पर्याय चर्चेत आहे. २८ जानेवारी हा बुधवार असल्याने त्या दिवशी मतदान घेणे मतदारांसाठी अधिक सोयीचे ठरेल, असे मतही व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रेस क्लब खामगावच्या वतीने अमोल अंधारे यांना मानाचा 'जिल्हा भूषण पुरस्कार – 2026'

खामगाव :समाजासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान व्हावा, या उद्देशाने प्रेस क्लब खामगाव (नोंदणीकृत संस्था) यांच्या वतीने दरवर्षी पत्रकार दिनी पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात येतो. याच परंपरेनुसार यावर्षीचा मानाचा व प्रतिष्ठेचा □ 'जिल्हा भूषण पुरस्कार – २०२६' युवा नेतृत्व अमोलजी अंधारे यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार पत्रकार दिनानिमित्त प्रदान करण्यात येणार आहे.
प्रेस क्लब खामगाव समाजातील सकारात्मक, प्रेरणादायी व परिवर्तनकारी कार्याची दखल घेणारी संस्था असून, आपल्या कार्यातून समाजात आशा, विश्वास व सामाजिक सलोखा निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान दरवर्षी करण्यात येतो. यावर्षीही अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा संपन्न होणार आहे.
समाजहितासाठी अविरत कार्य करत युवा संघटन, गौरक्षण, लव्ह जिहादविरोधी जनजागृती, सामाजिक सलोखा जपणे, महिला सशक्तिकरण या क्षेत्रांबरोबरच जनजाती बांधव, शेतकरी व शेतमजूर वर्गाच्या प्रश्नांसाठी सतत कार्यरत, तसेच रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन करून सर्व समाजासाठी आरोग्यविषयक जनजागृती करणारे नेतृत्व म्हणून अमोल अंधारे यांची ओळख आहे. हे सर्व कार्य ते गेल्या तीन दशकांपासून निस्वार्थ भावनेने करीत आहेत.
देव, देश व राष्ट्रकार्याकरिता सदैव २४ तास तत्पर राहून, त्यांनी आपल्या विचार व कृतीतून संपूर्ण विदर्भात संघटित, सजग व राष्ट्रनिष्ठ युवा शक्ती निर्माण केली आहे.
त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक योगदानामुळे समाजात सकारात्मक विचारांची चळवळ उभी राहिली असून अनेक युवकांना कार्याची दिशा मिळाली आहे. त्यांच्या या बहुआयामी व प्रेरणादायी कार्याची दखल घेत त्यांना मानाचा 'जिल्हा भूषण पुरस्कार – २०२६' जाहीर करण्यात आला आहे.

### जाहीर सूचना

मी श्री. शंकर देवराव कोंगरे, रा. नांदोरी, ता. सावनेर, जि. नागपूर येथील कायमस्वरूपी रहिवासी आहे. माझा मुलगा अमित शंकर कोंगरे दिनांक ३०/०९/२०२५ रोजी शासकीय दवाखाना, मेडिकल कॉलेज नागपुर येथे मरण पावला आहे. त्याच्या नावावर नोंद असलेली दुचाकी वाहन क्रमांक MH 40 CK 6431 ही माझ्या नावे RTO कार्यालयामार्फत हस्तांतरित (ट्रान्सफर) करावयाची आहे. तरी सदर वाहनाबाबत कोणास काही हरकत / आक्षेप असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत माझ्या खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात संपर्क साधावा. दिलेल्या मुदतीत कोणताही आक्षेप न आल्यास सदर वाहन हस्तांतरित करण्याबाबत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याचा मला पूर्ण अधिकार राहील.

आपला विश्वासू,
शंकर देवराव कोंगरे
मु. नांदोरी, ता. सावनेर,
जि. नागपूर – 441112
मो. नं.:9326937200

# पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे जयंती आहे. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे

# इजिप्शियन संस्कृतीतील विज्ञानाचा उत्क्रांतीशील प्रवास

## सफर विज्ञानाची





मानवजातीच्या इतिहासात काही संस्कृती अशा आहेत की ज्या केवळ सत्ता, संपत्ती किंवा विजयासाठी ओळखल्या जात नाहीत, तर ज्या माणसाला निसर्गाकडे पाहण्याची नवी दृष्टी देतात. इजिप्शियन संस्कृती ही अशीच एक संस्कृती होती. इथे विज्ञान म्हणजे प्रयोगशाळेत बसून केलेले प्रयोग नव्हते; विज्ञान म्हणजे नाईल नदीकडे पाहणे, तिच्या प्रवाहाचे निरीक्षण करणे, आकाशातील ताऱ्यांच्या हालचाली लक्षात ठेवणे, माणसाच्या शरीरातील जखम कशी भरते हे समजून घेणे, आणि या सगळ्या अनुभवांना स्मृतीत नव्हे तर लेखनात साठवणे. इजिप्शियन विज्ञान हे पुस्तकातून जन्माला आले नाही; ते जीवनातून जन्माला आले.

इजिप्तची संस्कृती नाईल नदीशिवाय समजूनच येऊ शकत नाही. नाईल ही केवळ पाण्याची वाहिनी नव्हती, ती एक नैसर्गिक प्रयोगशाळा होती. दरवर्षी ठराविक काळात येणारा पूर, पाणी ओसरल्यानंतर उरलेली सुपीक गाळ, त्यावर उगवणारी पिके—या सगळ्यात एक निश्चित नियम दिसत होता. इजिप्शियन लोकांनी हा नियम ओळखला. त्यांनी नाईलच्या पाण्याची उंची मोजायला सुरुवात केली. साध्या दगडी मोजपट्ट्यांपासून पुढे विकसित झालेले मोजमाप म्हणजे प्रारंभिक जलशास्त्र (hydrology). पूर जास्त आला तर शेती बुडणार, कमी आला तर दुष्काळ पडणार—हे त्यांनी अनुभवातून शिकले आणि त्या अनुभवावर आधारित नियोजन केले.या निरीक्षणांतूनच वेळेची संकल्पना अधिक स्पष्ट झाली. नाईलचा पूर, पेरणी, कापणी—हे सगळे एका ठराविक चक्रात घडत होते. इजिप्शियनांनी आकाशाकडे पाहिले. त्यांनी पाहिले की काही तारे विशिष्ट काळात उगवतात. विशेषतः सिरीयस तारा (Sirius) नाईलच्या पुराच्या आधी उगवतो हे त्यांच्या लक्षात आले. इथूनच पंचांगाची निर्मिती झाली. ३६५ दिवसांचे वर्ष, १२ महिने, ऋतूंची विभागणी—ही केवळ धार्मिक गरज नव्हती, तर वैज्ञानिक गरज होती. शेती टिकवण्यासाठी वेळ मोजणे आवश्यक होते. खगोलशास्त्र (astronomy) इथे भविष्य सांगण्यासाठी नव्हे, तर अन्न निर्माण करण्यासाठी वापरले गेले.इजिप्शियन विज्ञानाचा सर्वात भव्य आविष्कार म्हणजे पिरॅमिड. आजही माणूस त्या रचना पाहून थक्क होतो. एवढ्या प्रचंड दगडांचे ब्लॉक्स, इतकी अचूक सममिती, इतकी अचूक दिशा—हे सगळे कसे शक्य झाले? इथेच इजिप्शियन भूमिती (geometry) आणि अभियांत्रिकी (engineering) समजते. त्यांनी कोन मोजले, लांबी मोजली, समतल पृष्ठभाग तयार केले. दोरखंड, लाकडी पट्ट्या, साधी साधने वापरून त्यांनी अचूक मोजमाप साधले. पिरॅमिड्स उत्तर-दक्षिण दिशेला अचूक उभे आहेत, हे केवळ धार्मिक श्रद्धेमुळे नव्हे; हे निरीक्षण, मोजमाप आणि गणिती समजुतीमुळे शक्य झाले.

गणित हे इजिप्शियनांसाठी संख्यांचा खेळ नव्हता, तर व्यवहाराचे साधन होते. जमिनीचे मोजमाप, करआकारणी, धान्याचे साठे, मजुरांचे वेतन—सगळे गणितावर आधारित होते. त्यांनी अपूर्णांकांचा वापर केला, क्षेत्रफळ मोजले, घनफळाची कल्पना विकसित केली. आज आपण ज्या गणिताला शुद्ध अमूर्त शास्त्र मानतो, त्याची मूळ बीजे इथे व्यवहारातून रोवली गेली.

वैद्यकशास्त्राच्या बाबतीत इजिप्शियन संस्कृती फार पुढारलेली होती. ममीकरणाच्या प्रक्रियेमुळे त्यांना मानवी शरीराची अंतर्गत रचना माहिती झाली. हाडे, स्नायू, अवयव—हे सगळे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. पॅपायरसवर लिहिलेली वैद्यकीय ग्रंथसंपदा




आजही उपलब्ध आहे. जखमा कशा भरतात, फ्रॅक्चर कसे बांधायचे, शस्त्रक्रिया कशा करायच्या—याचे तपशीलवार वर्णन आढळते. आजच्या भाषेत सांगायचे तर इजिप्शियनांनी निरीक्षणाधारित वैद्यक (empirical medicine) विकसित केले होते. अर्थात, त्यात काही धार्मिक घटक होते, पण उपचार केवळ मंत्रांवर अवलंबून नव्हते; औषधे, मलम, शस्त्रक्रिया यांचा वापर होत होता.रसायनशास्त्र (chemistry) हे इजिप्शियन विज्ञानाचे एक वेगळे अंग होते. ममीकरण ही प्रक्रिया स्वतःत एक रासायनिक प्रयोग होती. शरीर टिकवण्यासाठी कोणती द्रव्ये वापरायची, ओलावा कसा काढायचा, दुर्गंधी कशी टाळायची—हे सगळे अनुभवातून शिकले गेले. रंगद्रव्ये तयार करणे, धातू वितळवणे, काच बनवणे—या सगळ्या प्रक्रियांमध्ये रसायनशास्त्राची प्राथमिक समज दिसते. आजही काही इजिप्शियन रंग हजारो वर्षांनंतरही तस्सेच टिकून आहेत, हे त्या ज्ञानाचे प्रमाण आहे.

लेखन हे इजिप्शियन विज्ञानाचे सर्वात महत्त्वाचे साधन होते. हायरोग्लिफ्स (hieroglyphs) म्हणजे केवळ चित्रलिपी नव्हती; ती ज्ञान साठवण्याची पद्धत होती. नोंदी ठेवल्या गेल्या, निरीक्षणे लिहून ठेवली गेली, पुढच्या पिढ्यांना ज्ञान हस्तांतरित झाले. जिथे लेखन नसते, तिथे विज्ञान मर्यादित राहते. इजिप्तमध्ये लेखनामुळे विज्ञान टिकले, वाढले आणि संरक्षित राहिले.

इजिप्शियन अभियांत्रिकी केवळ पिरॅमिडपुरती मर्यादित नव्हती. कालवे, बंधारे, धरणे, शहरे—हे सगळे नियोजनातून उभे राहिले. दगड वाहून नेण्यासाठी रॅम्प्स वापरणे, पाण्याचा प्रवाह नियंत्रित करणे—या सगळ्यात भौतिकशास्त्राची (physics) प्राथमिक समज दिसते. वजन, घर्षण, उतार—या संकल्पना शब्दांत नव्हत्या, पण कृतीत होत्या.

मात्र, इथेच एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. एवढे प्रगत विज्ञान असूनही इजिप्शियन संस्कृती पुढे का गेली नाही? उत्तर विज्ञानाच्या स्वरूपात आहे. इजिप्शियन विज्ञान हे मुख्यतः परंपराधारित होते. ज्ञान जपले गेले, पण त्यावर प्रश्न विचारण्याची परंपरा फारशी विकसित झाली नाही. धर्म आणि राजसत्ता यांनी ज्ञानाला स्थिर केले. जे एकदा योग्य मानले गेले, ते बदलण्याची गरज वाटली नाही. त्यामुळे विज्ञान टिकले, पण वेगाने पुढे गेले नाही.

पुढे ग्रीक लोक जेव्हा इजिप्तमध्ये आले, तेव्हा त्यांनी हे ज्ञान पाहिले, आत्मसात केले आणि त्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली. इजिप्शियन निरीक्षण + ग्रीक तर्क = पुढील वैज्ञानिक क्रांती. म्हणजेच, इजिप्शियन संस्कृती ही आधुनिक विज्ञानाची जननी नसली, तरी ती त्याची अत्यंत महत्त्वाची आजी होती.सफर विज्ञानाची आपल्याला हेच शिकवते की विज्ञान अचानक उगवत नाही. ते नाईलच्या पुरासारखे हळूहळू वाढते, अनुभवातून आकार घेत जाते. इजिप्शियन संस्कृतीने मानवाला हे शिकवले की निसर्गाशी भांडून नव्हे, तर निसर्ग समजून घेऊनच प्रगती करता येते. निरीक्षण, मोजमाप, स्मरण आणि शिस्त—या चार स्तंभांवर इजिप्शियन विज्ञान उभे होते.आज आपण उपग्रह, संगणक, प्रयोगशाळा वापरतो. पण त्या सगळ्याच्या मुळाशी एक शेतकरी उभा आहे, जो नाईलच्या काठावर उभा राहून आकाशाकडे पाहतो आहे, पाण्याची पातळी मोजतो आहे, आणि विचार करतो आहे—यावर्षी पूर कसा येईल? विज्ञानाचा हा प्रवास इजिप्तपासून सुरू होतो आणि आजपर्यंत अखंड वाहत राहतो. हीच आहे सफर विज्ञानाची.

**प्रा.डॉ.जयसिंग गाडेकर**

(लेखक विज्ञानाचे अभ्यासक आहेत.)

# बलात्कारी कुलदीप सेंगरला तुरुंगात नाही,तर फासावर लटकवायला हवे

उन्नाव बलात्कार प्रकरणी सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिल्यानंतर पीडित महिला व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.कारण सेंगरच्या जामिन अर्जावर स्थगिती आल्याने सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या पळवाटांवर अंकुश लागला आहे.परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की राजकीय पुढाऱ्यांच्या अशा घृणास्पद केसचा निकाल कासवाच्या गतीने का चालतो किंवा का लांबविल्या जातो हा मोठा गंभीर आणि गहन प्रश्न आहे.कारण सर्वसामान्यांच्या केसमध्ये सरकार व कायदा तडकाफडकी निर्णय घेतो आणि निर्णय लावतो ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.परंतु आपण ज्याला लोकप्रतिनिधी, आमदार म्हणतो असे माजी आमदार कुलदीप सेंगर यांच्या बलात्कार केस प्रकरणाला तब्बल आठ वर्षे पुर्ण झालीत म्हणजे तब्बल २९२० दिवस तरीही पीडितेला अजुन पर्यंत योग्य न्याय मिळालेला नाही ही दुर्भाग्यपुर्ण बाब आहे.उन्नाव बलात्कार प्रकरण जर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालविले असते तर आतापर्यंत सेंगर फासावर लटकला असता.सर्वांनाच कल्पना आहे की सेंगर दोषी आहे. परंतु सरकारने जर जातीने पुढाकार घेतला असता तर सेंगरला केंव्हाच फाशी झाली असती हेही तितकेच सत्य आहे..परंतु सरकार सुध्दा सेंगरला वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की,एका बलात्कारी सेंगरला जर ताबडतोब फाशी झाली तर देशातील राजकीय वर्तुळात भुकंप येईल व बलात्कार प्रकरणावर अंकुश लागेल हेही तितकेच सत्य आहे.राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की काही लोक सत्तेच्या पडद्याआड अनेक घृणास्पद कृत्य करीत असतात.तेच काम कुलदीप सेंगरने सत्तेमध्ये असतांना २०१७ मध्ये केले.परंतु आताही उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी यांच्यावर अजून पर्यंत कठोर शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. देशाती कोणतेही बलात्कार प्रकरण असो अशा केसेसचा निकाल फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालायला पाहिजे व यात ताबडतोब फाशीच्या शिक्षेचे प्रावधान असणे गरजेचे आहे.कारण कुलदीप सेंगर सारखे असे हजारो राजकीय पुढारी आहेत की आपल्या सत्तेचा,संपत्तीचा आणि अधिकाराचा गैरवापर करून घृणास्पद कृत्य करीत असतात. २०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात मोठा निर्णय घेतांना सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली हायकोर्टाच्या त्या आदेशाला स्थगिती दिली, ज्यामध्ये अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणी दोषी आणि भाजपमधून हकालपट्टी करण्यात आलेले कुलदीप सेंगर यांची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्यात आली होती.अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणारा नराधम कुलदीप सेंगर याच्या केसचा ताबडतोब निर्णय लावून फाशीच्या शिक्षेचीच मागणी मुख्यत्वे करून सरकारकडून व इतर संपूर्ण राजकीय स्तरातून व्हायला पाहिजे. आता सरकारने वेळ न घालवता उन्नाव बलात्कार प्रकरणातील ठोस पुरावे पहाता पीडीतेला न्याय देण्याच्या उद्देशाने सामोर येण्याची गरज आहे जेणेकरून नराधम बलात्कारी कुलदीप सेंगर याला लवकरात लवकर फाशीची सजा होईल.कारण कुलदीप सेंगरच्या या घृणास्पद कृत्य पहाता सर्वच स्तरातून फाशीच्या शिक्षेची मागणी होत आहे.त्यामुळे सन्माननीय सर्वोच्च न्यायालय यांना माझी नम्र विनंती आहे की उन्नाव बलात्कार प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर लावून नराधम सेंगरला फासावर लटकविला पाहिजे. तेव्हाच पीडीतेला योग्य न्याय मिळेल व लोकशाहीला नवी दिशा मिळेल.

लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**

( स्वतंत्र पत्रकार )

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# वडाच्या झाडाला , झुडूप ठेवणे । त्याचे ते राहणे , शक्य नाही ॥



जीवनात प्रत्येक क्षणाला स्पर्धा आहे. स्पर्धा म्हटले की, नियोजन आणि योग्य अशी तयारी लागते. जीवनाच्या या परीक्षेची... स्पर्धेची तयारी करताना, जीवनात कलागुणांची कास तर, धरावी लागतेच. पण, इमानदारी फार महत्त्वाची आहे. त्याशिवाय, मिळालेले यश म्हणजे लबाडीने मिळवलेल्या एखाद्या खजिनासारखे होय. खजिना किंवा यश जवळ आहे पण, सुख नाही...तर, फक्त भीती आहे. असे असले तरी, समाजातील काही दृष्ट प्रवृत्तीची माणसे ही काही गोष्टी साध्य करण्यासाठी कूटकारस्थान करतांना आपण पाहत असतो. स्वतःच्या अंगी योग्यता नसताना ती, सिद्ध करण्यासाठी इतरांच्या मध्ये काही वाईट नसताना... वाईट बोलून... त्या , माणसाची प्रतिमा समाजात मलिन करण्याचा प्रयत्न करीत असतात. पण, ते विसरतात की, आपण त्या माणसाची प्रगतीची उंची थांबवित असलो... तरीही, त्याचा विस्तार थांबवता येत नसतो. अशा प्रकारचा आशय हिवरा आश्रम येथील कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री अभंगाच्या पहिल्या चरणात सांगतात की,

शेंडे खुडूनिया , उंची थांबवाल I पण विस्तारेल , त्याचे काय II

प्रस्तुत अभंगातील वृक्ष हा शब्द झाड असा जरी वाटत असला तरी, त्यातील एक अर्थ असा होतो की, प्रगतीपथावरील एक सामान्य माणूस. हा सामान्य माणूस आपल्या कार्यातून आपला भाव आणि भक्ती व्यक्त करतो. पण , भाव आणि भक्तीचे ढोल वाजवीत नाही. त्याची भक्ती ही एखाद्या फुलाच्या सुगंधाप्रमाणे असते. फुलाला जशी आपल्या सुगंधाची दवंडी पिटवावी लागत नाही. त्याचप्रमाणे सामान्य माणसाचे कार्य असते. त्या माणसाच्या प्रगतीचे झेंडे आपल्या ओळखीच्या, पदाच्या आणि पैशाच्या भरवशावर खुडणारी माणसे... त्यांची उंची कमी करत असली तरीही , ते अप्रत्यक्ष त्याचा विस्तार करीत असतात. शेवटी प्रगतीला विरोध करणाऱ्या अज्ञानी माणसाला त्याच माणसाच्या गुणवत्तेच्या गर्द सावलीत बसून जीवनातील शांती मिळते, असे कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री अभंगाच्या दुसऱ्या चरणात सांगतात की,

शेवटी त्याच्याच , गर्द सावलीत I बसूनी निवांत , शांती मिळे II

गुणवान माणसाची गुणवत्ता प्रकाशात येऊ नये, म्हणून त्यांची लोकाभिमुख उंची कमी करण्यासाठी शेंडे खुडणाऱ्या , ज्ञानानी खुज्या असणाऱ्या माणसाला बोधामृत पाजतांना कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री म्हणतात की, वडाच्या झाडाला जसे झुडुप करणे शक्य नाही. तसे, गुणवान माणसाच्या प्रगतीची उंची कमी करणे शक्य नाही. तसा प्रयत्न करणे म्हणजे आपण आपल्या कृतीने आपले अज्ञान प्रकट करणे होय. आपल्या आवाक्याबाहेरील अशक्य गोष्टीला शक्य करण्याचा प्रयत्न म्हणजे अज्ञान होय. कुठलीही गोष्ट करण्यापूर्वी आपला आवाका आणि समोरची गुणवत्ता या दोन्हीची जाण ठेवण्याचा उपदेश जणूकाही कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री अभंगाच्या तिसऱ्या चरणात करतात की,

वडाच्या झाडाला , झुडूप ठेवणे I त्याचे ते राहणे , शक्य नाही II

थोर भौतिक शास्त्रज्ञ न्यूटन यांचा गतिविषयक तिसरा नियम असा आहे की, जेव्हा एक वस्तू दुसऱ्या वस्तूवर बल लावते. त्याचवेळी दुसरी वस्तू देखील पहिल्या वस्तूवर तेवढ्याच प्रमाणात उलट दिशेने बल लावते. हा विचार विज्ञानवादी संत शुकदासजी महाराजश्री यांनी अभंगाच्या शेवटच्या चरणात मांडला असून त्यांनी अज्ञानी लोकांना उपदेश करताना असे सांगितले की, गुणीजनांची निंदा करू नका ! त्यांच्या प्रगतीची शेंडे खुडू नका ! कारण, तुम्ही जेवढी त्यांची गुणवत्ता दाबाल तेवढी, ती उफाळून वर येणार आहे. तेव्हा, आपण सर्वांनी गुणीजनांचा आणि त्यांच्यातील सद्गुणांचा आदर करावा, अशा प्रकारचा उपदेश कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री अभंगाच्या शेवटच्या चरणात करतात की ,

शुकदास म्हणे, जेवढे दाबाल I वरती येईल, उफाळूनी II

थोडक्यात, प्रत्येकाने आपल्यामधील क्षमता ओळखून ... त्या क्षमतेचा उपयोग करून स्वतःचे जीवन आणि समाजजीवन सुंदर करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करावा , असा उपदेश कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री प्रस्तुत अभंगामधून समाजातील अज्ञानी आणि समाजाच्या प्रगतीचे शत्रू असलेल्या माणसाला करतात.

भगवान राईतकर

मेहकर

# कर्तबगार, महत्वाकांक्षी आधुनिक काळातील भारतीय स्त्री: रितु(ऋतू) करिधाल!

भारतीय स्त्री म्हटले की कर्तबगार, मनमिळाऊ, महत्त्वाकांक्षी, तरीही मानवी जीवनाचे महत्त्व जाणणारी, इतरांचे प्रश्न समजून घेऊन स्वतःचे प्रश्न सोडवणारी, बंड पुकारतानाही आपल्या अपेक्षांचे ओझे कोणावर न पडू देणारी सोशिक स्त्रीची प्रतिमा समोर येते. तिच्यात कोणतीच कमतरता नाही असे नाही पण जे तिच्या जवळ आहे त्याची डोळसपणे जाण ठेवणारी अशी ही स्त्री. तिची झेप तिच्या पुरती, वैयक्तिक असली तरीही त्यामुळे एकंदरीत भारतीय स्त्रीला केवढे मोठे आकाश खुले झाले हे प्रत्येक स्त्रीला गौरवान्वित करणारे आहे. अशा काही स्त्रियांचा थोडक्यात अभ्यास करताना प्रत्येकीच्या यशस्वितेसाठी दिलेल्या संघर्षात, लढ्यात समाजातील इतर उदयोन्मुख व्यक्तिरेखांना प्रेरणा मिळेल असे काहीतरी हाती लागतेच! प्रगतीच्या वाटेत येणाऱ्या अडथळ्यांना अलगद पार करून प्रकाशमान यशाशी गळाभेट घेणाऱ्या काही कर्तृत्ववान स्त्रिया या नेहमीच सामान्यातील सामान्य स्त्रीलाही मार्गदर्शक ठरतात. अशाच ध्येयाने प्रेरित झालेल्या या भारतीय महिलेची यशोगाथा संक्षिप्त रूपाने समोर ठेवताना मन त्यांच्याप्रति वाटणाऱ्या अभिमानाने भरून जाते. रितू करिधाल आकाशातील ताऱ्यांकडे पाहता पाहता वैज्ञानिक होऊन देशाच्या मोठ्या मोठ्या अवकाशयानांच्या उड्डाणासाठी काम करते! चारचौघीं सारख्या दिसणाऱ्ी ही किरणशलाका एका ध्येयाने प्रेरित होऊन जेंव्हा आगेकूच करू लागली तेंव्हा सा-यांचे डोळे दिपून गेले!

लहानपणी ग्रहताऱ्यांकडे आकर्षित होणारी रितू नेहमी त्या अथांग अंतरिक्षापल्याड काय दडलेले आहे याचा विचार करत असे. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेली रितू गर्ल्स कॉलेजमध्ये अगदी साधेपणाने शिकली. पुढे लखनऊच्या विश्वविद्यालयातून पदवीपर्यंत शिक्षण घेतले. गेट परीक्षा पास झाल्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस ला बंगलोर मध्ये प्रवेश घेऊन तेथे ती एअरोस्पेस इंजिनियर झाली. पुढे ती १९९७ मध्ये इस्त्रोशी जोडल्या गेली. चंद्रयान- २ ची मिशन डायरेक्टर रितू करीधाल अशा प्रकारे आयआयटी वगैरेच्या मागे न लागता साधेपणाने इस्त्रोची सीनियर सायंटिस्ट बनली. रितूने इसरो मध्ये अनेक महत्त्वाचे प्रोजेक्ट केले आहेत. ती मंगळयानाची डेप्युटी ऑपरेशन डायरेक्टर देखील होती. विज्ञान एक विषय नसून माझ्यासाठी उत्कटतेने सांभाळलेले वेड आहे असे ती मानते.

उत्तर प्रदेशातील लखनऊतील राजाजीपुरम् मध्ये रितु वाढली. आई-वडिलांचे निधन झालेले. छोट्या भावाची जबाबदारी, बहिणीची जबाबदारी, तिला दोन मुले ही आहेत. रितू सर्वांचा व्यवस्थित सांभाळ करते. देशाच्या महत्त्वाच्या प्रकल्पातील यश मिळत राहो हीच देवाला प्रार्थना! भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संघटन इस्त्रो सोबत काम करणारी भारतीय वैज्ञानिक असलेली एप्रिल 1975 ला जिचा जन्म झाला

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

१ २ ३ ४ ५ ६


## महत्त्वाचे...



### जळगावात भाजपच्या आदेशाची ऐशी-तैशी! निष्ठावंत वाऱ्यावर

जळगाव: जळगाव महानगरपालिकेमध्ये भाजपने आज दुसरे खाते उघडले असून भाजपचे जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे यांचे पुत्र विशाल भोळे यांची प्रभाग क्रमांक सात मधून बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्याविरोधात असलेल्या आठ जणांनी अर्ज माघारी घेतल्याने आज बिनविरोध निश्चित झाली. एकीकडे भाजपने आदेश दिले असताना आमदार -खासदारांच्या घरातील नातेवाईक अथवा पुत्र कुणालाही उमेदवारी देण्यात येऊ नये, असे आदेश असले तरी, मात्र भाजप आमदार सुरेश भोळे यांनी या आदेशाला केराची टोपली दाखवत आधी पत्नी सिमा भोळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर त्यांना एबी फॉर्म न दिल्याने त्यांचे पुत्र विशाल भोळे यांना एबी फॉर्म दिला आणि आज विशाल भोळे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे नाशिक येथील आमदार देवयानी फरांदे यांच्या घरातील उमेदवारांनी अर्ज दाखल केला होता, मात्र पक्षाचा आदेश असल्याने त्यांनी त्यांच्या घरातील उमेदवारांचा उमेदवारी अर्ज दाखल न करण्याचा निर्णय घेतला. एकंदरीत त्यांनी पक्षांच्या आदेशाचे, सूचनेचे पालन तंतोतंत केले. तरी मात्र जळगाव शहरातील भाजपचे आमदार सुरेश भोळे यांनी या आदेशाची पायमल्ली केली असल्याने सुरेश भोळे यांना भाजपाचा आदेश मान्य नसावा, अशीच चर्चा सध्या सुरू आहे. दुसरीकडे भारतीय जनता पार्टीने अनेकठिकणी निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलले असून त्यांचा आक्रोश पाहायला मिळाला आहे. तिकिटासाठी कार्यकर्ते वणवण भटकंती करत होते. पक्ष आपल्यालाच उमेदवारी देईल, या आशेने उमेदवार पक्षाकडे डोळे लावून होते, मात्र निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून पण आमदारांच्या पुत्राला उमेदवार करुन बिनविरोध केल्याने निष्ठावान कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी दर्शवली आहे.

### मनसे पदाधिकाऱ्याची निवडणुकीच्या वादातून निर्घृण हत्या



सोलापूर: महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत सोलापुरात रक्ताचा सडा पडला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय वादाचे रूपांतर रक्तरंजित संघर्षात झाले असून, मनसेच्या एका तरुण पदाधिकाऱ्याची धारदार शस्त्राने भोकसून हत्या करण्यात आली आहे. बाळासाहेब सरवदे (रा. जोशी गल्ली, जुना बोरामणी नाका) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर सोलापुरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून संतप्त जमावाने भाजप कार्यालयावर हल्ला चढवत तोडफोड केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मृत बाळासाहेब सरवदे यांच्या घरातील महिला सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार होत्या. मात्र, ऐनवेळी पक्षाने त्यांचा पत्ता कट करून विरोधकांना उमेदवारी जाहीर केली. याच उमेदवारीच्या कारणावरून गेल्या दोन दिवसांपासून जोशी गल्ली परिसरात दोन गटांत खटके उडत होते. शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. याच वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि बाळासाहेब यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# राहुल नार्वेकरांकडून कायदे धाब्यावर बसवत लोकशाहीचा खून

## आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, हर्षवर्धन सपकाळांचे राज्य निवडणूक आयोगाला पत्र

दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबई - महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईत मोठा वाद निर्माण झाला आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी कुलाबा परिसरात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राजकीय पक्षांच्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरू दिले नाहीत, असा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. यावरून आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना पत्राद्वारे राहुल नार्वेकर यांच्यावर आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रात म्हटले की, राज्यात महानगरपालिकांच्या निवडणुका सुरु असून आदर्श आचारसंहिता लागू आहे. लोकशाहीमध्ये निवडणूका निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भिड वातावरणात पार पाडणे हे आपल्या आयोगाचे कर्तव्यच आहे. परंतु या निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर हरप्रकारे दबाव आणून अर्ज मागे घेण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. यात सर्वात महत्वाचे म्हणजे विधानसभेचे विद्यमान अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करुन घेऊ नये यासाठी प्रशासनावर दबाव आणला, विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले हे अत्यंत गंभीर आहे. राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर आहेत, त्यांच्याकडून अशापद्धतीने कायदा धाब्यावर बसवून दडपशाहीचा मार्ग अवलंबणे लोकशाहीचा खून करण्यासारखे कृत्य आहे.

संवैधानिक पदावरील व्यक्तीने लोकशाहीचे धिंडवडे काढले

पुढे हर्षवर्धन सपकाळ लिहितात की, मुंबईतील कुलाबा विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्रमांक 225, 226 व 227 मधून राहुल नार्वेकर यांचे भाऊ मकरंद नार्वेकर, बहिण गौरवी शिवलकर व वहिनी हर्षदा नार्वेकर या तिघांनी भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत, अर्ज दाखल करताना राहुल नार्वेकर हे स्वतः उपस्थित होते. सायंकाळी 5 वाजण्याच्या सुमारास अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असताना राहुल नार्वेकर यांनी पोलिसांच्या माध्यमातून भाजप उमेदवारांच्या विरोधात अर्ज दाखल करणाऱ्या विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले तसेच अर्ज भरण्यापासून




रोखण्यात आले, अशा प्रकारे एका महत्वाच्या व संवैधानिक पदावरील व्यक्तीने लोकशाहीचे धिंडवडे काढून निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणला आहे या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कुटुंबातील तीन सदस्य निवडणुकीत उभे आहेत, त्यांच्या प्रचारासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयातील तब्बल 70 अधिकारी व कर्मचारी काम करत आहेत, शासकीय पदावरील हे अधिकारी व कर्मचारी एका पक्षाच्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचारात सक्रीय भाग घेत असतील तर ते कायद्यानुसार चुकीचे आहे. स्वतः राहुल नार्वेकर यांचे वर्तन आक्षेपार्ह व आदर्श आचारसंहितेचा भंग करणारे असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी तसेच त्यांच्या कार्यालयातील सर्व 70 अधिकारी व कर्मचारी यांना कार्यमुक्त करून त्यांच्यावरही आचार संहिता भंगाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

तसेच आमच्या मागणीचा गांभिर्याने विचार करून कारवाई करावी व महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे आणि निवडणूक आयोगाच्या पाठीचा कणा मजबूत आहे हे आपण दाखवून द्यावे, असे आवाहन हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रातून केले आहे.

# दलित साहित्य भारतीय साहित्य विश्वाचा भक्कम आधारस्तंभ:लेखिका मृदुला गर्ग यांचे प्रतिपादन

दिव्य वतन /वृत्तसंस्था




साहित्यिक क्षेत्रातील सर्वात मोठी क्रांती म्हणजे दलित साहित्याची निर्मिती होय. मराठी साहित्य हे इतर भारतीय भाषांच्या तुलनेत नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. भारतीय भाषांमध्ये दलित साहित्य पहिल्यांदा मराठी भाषेतच लिहिले गेले. मराठी दलित साहित्यातूनच इतर भाषिक साहित्यिकांनी दलित लेखनाची प्रेरणा घेत, त्यांच्या मार्गाने जात आपल्या भाषांमध्ये दलित साहित्याची निर्मिती केली. त्यामुळे मराठी साहित्यातील दलित साहित्य हा भारतीय साहित्य विश्वाचा भक्कम आधारस्तंभ ठरला आहे, असे प्रतिपादन देशपातळीरील ज्येष्ठ लेखिका, विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांनी केले. आपले बहुभाषिक संस्कृतीचे वैभव पाहताना असे लक्षात येते की, अनेक हिंदी लेखकांनी मराठी, बंगाली, उडिया आणि इतर भारतीय भाषांमधील साहित्यकृतींमधून प्रेरणा घेतली आहे. ही बहुभाषिक संपन्नता सर्वच प्रकारच्या लेखकांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन आज (दि. २) डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या.

मराठी साहित्याशी भावनिक नाते

मराठी साहित्याशी असलेले माझे भावनिक नाते कधीच ओसरलेले नाही तर काळाच्या ओघात ते अधिकच गडद होत गेले, असे सांगून डॉ. मृदुला गर्ग म्हणाल्या, मी वाचलेले पहिले मराठी पुस्तक म्हणजे शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' ही कादंबरी. या कादंबरीचा मी हिंदी अनुवाद वाचला होता. महाभारतातील 'कर्ण' हा माझा आवडता नायक असल्यामुळे हे पुस्तक वाचणे हा माझ्यासाठी अत्यंत भावूक [illegible] समृद्ध करणारा अनुभव [illegible] या नंतर छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील 'छावा' ही कादंबरी देखील मी वाचली.

त्यानंतर ज्या लेखकाने माझ्या विचारांना पूर्णपणे कवेत घेतले, ते म्हणजे दलित साहित्यातील बंडखोर व्यक्ती नामदेव ढसाळ. "तुमच्या कवितेत केवळ राग आणि विद्रोहच का असतो?" या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले होते, "माझे कार्य लास्याचे नव्हे तर तांडवाचे सूर आळवते." त्यांचे हे शब्द माझ्या मनात आणि हृदयात खोलवर रुजले. १९८० पासून मी त्यांचे साहित्य आणि त्यांच्याबद्दल सातत्याने वाचत आले आहे. ते एक श्रेष्ठ कवी, लेखक आणि मानवी हक्कांचे पुरस्कर्ते होते. जातिभेद नष्ट करण्यासाठी आणि दलित अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी 'दलित पँथर' ही लढाऊ संघटना उभी केली.


# डमी मतदारसंघानंतर आता डमी उमेदवार

## मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत घोळ, राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल

दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबई - मुंबईच्या पवई येथे डमी मंतदारसंघाप्रमाणे डमी उमेदवार देखील उभे केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या संदर्भात दिव्य मराठीशी बोलताना भाजप कार्यकर्ते राजेश चिंदरकर यांनी माहिती दिली आहे.

या संदर्भात माहिती देताना राजेश चिंदरकर म्हणाले की, मुंबईच्या 156 वॉर्डमध्ये काँग्रेसच्या वतीने जी उमेदवारी भरली आहे, त्यांनी माजी नगरसेवक शरद पवार यांच्या पत्नी असल्याचा दावा केला आहे. तर त्यांच्या त्या दुसऱ्या पत्नी आहेत आणि त्यांचे नाव अंजली शरद पवार असे आहे. त्यांनी त्यांच्या पहिल्या पत्नीचा जो रेकॉर्ड आहे, सविता शरद पवार, या रेकॉर्डवर उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. ही दोन वेगवेगळी व्यक्तिमत्त्व आहेत आणि या प्रकरणाची संपूर्ण



चौकशी करण्यात यावी.

पुढे बोलताना त्यांनी माहिती दिली की, माझ्याकडे या प्रकरणातील संपूर्ण डॉक्युमेंट्स आहेत आणि ही सगळी कागदपत्र मी निवडणूक आयोगाकडे दिली आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी गागरानी साहेब यांच्याकडे देखील ही कागदपत्रे सादर केली आहेत. या सगळ्या कागदपत्रांची तपासणी करूनच कारवाई करावी, अशी माझी मागणी आहे. नाहीतर ही निवडणूक आयोगाच्या निर्णयाची पायमल्ली आहे. तसेच हा जनतेच्या विश्वासावर घाला आहे. कारण जनतेला माहित नसते की कोणता उमेदवार कोणत्या रेकॉर्डवर लढतो आहे.

हा डमी उमेदवार काँग्रेसचा असल्याचे राजेश यांनी सांगितले आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार सविता शरद पवार आणि शरद पवार यांना एक अपत्य होते आणि या दुसऱ्या पत्नी ज्या आहेत, अंजली शरद पवार यांना दोन अपत्य आहेत.

तर हे दोन अपत्यच फॉर्ममध्ये दाखवली जातात. पूर्वीच्या पत्नीचा आणि आपत्याचा कोणताही रेकॉर्ड दाखवला जात नसल्याचा दावा राजेश चिंदरकर यांनी केला आहे.

# नाशिकमध्ये भाजपचे दोन उमेदवार भिडले:पत्नीसह आलेल्या उमेदवारावर हल्ला

दिव्य वतन /वृत्तसंस्था

नाशिक- नाशिकमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असताना गोंधळ बघायला मिळाला. देवानंद बिरारी त्यांच्या पत्नीसह जेव्हा अर्जाच्या संदर्भात विभागीय कार्यालयात आले तेव्हा एका उमेदवाराने त्यांच्यावर हल्ला केल्याची घटना घडली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे इथे पोलिसांची तसेच यंत्रणांची तारांबळ उडल्याचे पाहायला मिळाले. नाशिकमध्ये पुन्हा एकदा दोन भाजपच्या उमेदवारांमध्ये संघर्ष पाहायला मिळाला आहे.

नाशिकच्या प्रभाग 31 ड येथील दोन उमेदवारांमध्ये संघर्ष झाल्याचे समजते. भाजपचे उमेदवार बाळकृष्ण शिरसाट व देवानंद बिरारी यांच्यात संघर्ष झाला. तसेच देवानंद बिरारी यांच्या पत्नी यांनी बाळकृष्ण शिरसाट यांना कोणीही मतदान करू नये, असे प्रसार माध्यमांसमोर येत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. तर



दुसरीकडे बाळकृष्ण शिरसाट यांनी आमच्यात कोणताही वाद झालेला नसल्याचे म्हटले आहे.या सगळ्या गोंधळानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत उमेदवारांना बाहेर काढल्याचे पाहायला मिळाले. नाशिकच्या सिडको विभागीय कार्यालयाच्या परिसरात काही काळासाठी गोंधळ निर्माण झाला होता. उमेदवारी अर्ज दाखल करत असताना देवानंद बिरारी आणि त्यांच्या पत्नीवर अचानक हल्ला करण्यात आल्याचा दावा बिरारी यांनी केला आहे. तर असा कोणताही वाद झाला नसल्याचे बाळकृष्ण शिरसाट यांनी म्हटले आहे.एकंदरीतच नाशिकमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या नाट्यमय घटना गेल्या काही दिवसांत पाहायला मिळाल्या आहेत. त्यात आता आजच्या घटनेची भर पडली आहे. नाशिकमधील महापालिकेची निवडणूक चांगलीच चुरशीची होणार असल्याचा अंदाज यावरून आपण लाऊ शकतो.दरम्यान, तिकडे दहिसरमध्ये भाजपच्या माजी बंडखोर नगरसेविका सुनीता राम नगीना यादव यांनी आज वॉर्ड क्रमांक 1 मधून शिवसेना-भाजप संयुक्त उमेदवार रेखा राम यादव यांच्या समर्थनार्थ आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

# मुंबईत रिपाइंचे स्वतंत्र अस्तित्व कायम:महायुतीत राहूनही २० जागांवर स्वबळाचा 'नवा फॉर्म्युला', रामदास आठवलेंची मोठी घोषणा

दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबई - केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांनी महायुतीमध्ये सन्मानजनक जागा, महामंडळे आणि मंत्रिपदाची मागणी करत सुरुवातीला काही उमेदवारांची यादी जाहीर केल्यामुळे भाजप-शिवसेनेसमोर काहीसा पेच निर्माण झाला होता. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी झालेल्या सविस्तर चर्चेनंतर आठवले यांनी आपण महायुतीसोबतच असल्याचे जाहीर करत या वादावर पडदा टाकला आहे. असे असले तरी, मुंबई महानगरपालिका निवडणुकीत रिपाइं 20 जागांवर मैत्रीपूर्ण लढत देणार असल्याचे त्यांनी आज पत्रकार परिषदेत स्पष्ट केल्याने, महायुतीत राहूनही आठवले यांनी मुंबईत स्वतंत्र अस्तित्व राखण्याचे संकेत दिले आहेत."आ गया है 2026 का नया वर्ष, हमे हो रहा है बहुत हर्ष.." अशा आपल्या खास शैलीतील काव्यमय चारोळीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच पत्रकारांशी संवाद साधला. येत्या 15 जानेवारीला होणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीवर भाष्य करताना त्यांनी राज्यात एनडीए (महायुती) अत्यंत भक्कम असल्याचे सांगितले. भाजप, शिवसेना आणि रिपाइं अनेक ठिकाणी एकत्रितपणे निवडणूक लढवत असून, नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीत महायुतीने सर्वाधिक जागा जिंकून मोठे यश मिळवले आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीत मात्र फूट पडलेली पाहायला मिळाली, असा टोलाही आठवले यांनी यावेळी लगावला.



पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आल्याने काँग्रेस वेगळी निवडणूक लढवत आहे. मुंबईत कोणत्याही परिस्थितीत महायुतीचा महापौर झाला पाहिजे हे आम्ही ठरवलं आहे. मुंबईत आम्हाला जागा न दिल्याने आम्ही 20 ठिकाणी मैत्रीपूर्ण निवडणूक लढवत आहोत. अनेक दिवस जागावाटप चालल्याने घोळ झाला, पण आम्हाला मुंबईत काही जागा मिळाल्या पाहिजे होत्या. 20 जागी आम्ही RPI चिन्हावर मैत्रीपूर्ण निवडणूक लढत देणार तर बाकी ठिकाणी आम्ही महायुतीला समर्थन देत आहोत.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात देशाचा विकास होत असून मुंबईच्या प्रगतीसाठी केंद्र सरकारने मोठा निधी दिला आहे, असे गौरवोद्गार काढत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी महायुतीतील जागावाटपावर भाष्य केले. पुणे, पिंपरी आणि इतर ठिकाणी रिपाइंला जागा मिळाल्या असल्या तरी, मुंबईत पक्षाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत व्यक्त करत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या सकारात्मक चर्चेची माहिती दिली;

# कोट्यवधी खर्चून बांधलेल्या इमारती धुळखात:किरकोळ कामांमुळे हस्तांतरण रखडले, एलएक्यू झाला आता काय करता? म्हणत अधिकाऱ्यांचा उद्दामपणा

दिव्य वतन /वृत्तसंस्था


हिंगोली- जिल्ह्यात करोडो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या इमारती धुळखात पडल्या असून किरकोळ कामांमुळे अनेक इमारतींचे बांधकाम रखडले आहे. विशेष म्हणजे बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या इमारतीचाही समावेश आहे. तर या प्रकरणात कार्यकारी अभियंता मात्र या प्रकरणात अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाला आहे आता काय प्रतिक्रिया देणार असे उद्दामपणाचे उत्तर देऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला आहे.

हिंगोली जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने विविध शासकिय इमारत, वसतीगृह, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचा समावेश आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व अभियंत्यांच्या दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी इमारतीचे हस्तांतरण झालेच नसल्याचे चित्र आहे. कळमनुरी येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचे बांधकाम ता. १५ डिसेंबर २०२४ रोजी पूर्ण झाले. या कामांवर ४.३७ कोटी रुपयांचा खर्चही झाला आहे. मात्र विद्युतीकरणाचे काम झाले नसल्याचे दाखवत हस्तांतरण थांबले आहे.

या शिवाय अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या दोन वसतीगृहाचे काम करण्यात आले आहे. त्यासाठी सुमारे ८.५० कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. मात्र या ठिकाणी किरकोळ व फर्निचरचे काम बाकी असल्याने हस्तांतरण थांबल्याचे सांगण्यात आले आहे. सदरील इमारती मार्च अखेर हस्तांतरीत होतील असेही सुत्रांनी स्पष्ट केले.

या शिवाय कळणनुरी येथेच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांचे निवासस्थानाचे संरक्षण भिंत बांधली नसल्याने हस्तांतरण झाले नाही. सदर काम पूर्ण होऊन एक वर्षाचा कालावधी लोटला असला तरी हस्तांतरण झाले नसल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, हिंगोली येथे बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता व इतर अभियंत्यांच्या निवासासाठी उभारण्यात आलेली इमारत ओस पडली आहे. इमारतीचे काम पूर्ण होऊन सुमारे आठ महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाला तरी अधिकाऱ्यांना निवासस्थानांमध्ये राहण्याचा मुहुर्तच सापडला नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे बहुतांश अधिकारी व कर्मचारी नांदेड येथून ये जा करीत असल्याचे चित्र आहे. अधिकाऱ्यांच्या अपडाऊन मुळे कामांच्या दर्जाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होऊ लागला आहे.या संदर्भात कार्यकारी अभियंता दिगंबर पोत्रे यांच्याशी संपर्क साधला असता इमारतीची माहिती घेऊन काय करणार त्याचा अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाला आहे.



## आरोग्य..

### पिस्ता खाण्याचे 11 फायदे:वजन कमी होते, रोगप्रतिकारशक्ती वाढते



निसर्गाने आपल्याला खाण्यापिण्याच्या अनेक अशा गोष्टी दिल्या आहेत, ज्या आरोग्यासाठी वरदानापेक्षा कमी नाहीत. पिस्ता (Pistachio) देखील त्यापैकीच एक आहे. इतर सुक्या मेव्यांप्रमाणेच, यात अनेक आवश्यक पोषक तत्वे भरपूर प्रमाणात आहेत आणि चवीसोबतच आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर आहे.नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, दररोज मर्यादित प्रमाणात पिस्ता खाल्ल्याने खराब कोलेस्ट्रॉल (LDL) पातळी कमी होते. यामुळे हृदयाच्या आरोग्याला फायदा होतो.तर, जर्नल ऑफ अमेरिकन कॉलेज ऑफ न्यूट्रिशन (JACN) मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे म्हटले आहे की पिस्त्याचे संतुलित सेवन वजन कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते.

तर चला, आज आपण पिस्त्याच्या आरोग्य फायद्यांबद्दल बोलूया. यासोबतच जाणून घेऊया की-पिस्त्याचे पौष्टिक मूल्य काय आहे?

युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चर (USDA) नुसार, पिस्ता प्रोटीन, फॅट आणि फायबर या तिन्हीचा उत्तम स्त्रोत आहे. आपण दिवसाला 25-30 ग्रॅम पिस्ता खाऊ शकतो. आता कल्पना करा की, जर तुमचे वजन 50 किलो असेल तर तुम्हाला दिवसभरात कमीतकमी 45 ग्रॅम प्रोटीन खाण्याची गरज आहे. जर तुम्ही इतका पिस्ता खाल्ला तर 5.84 ग्रॅम प्रोटीन तुम्हाला यातूनच मिळेल. यासोबतच दीडशे कॅलरीज मिळतील, ज्या शरीराला बराच काळ ऊर्जा देतील.

### लहान मुलांना चहा-कॉफी देऊ नका लक्ष केंद्रित करण्यात अडचण...



'टी बोर्ड ऑफ इंडिया' नुसार, भारतातील सुमारे 88% घरांमध्ये चहा प्यायला जातो. तर 'कॉफी बोर्ड ऑफ इंडिया'च्या एका सर्वेक्षणानुसार, 84% लोक चहा-कॉफीला त्यांचे आवडते पेय मानतात.

अनेक घरांमध्ये तर लहान मुलांनाही चहा-कॉफी दिली जाते. पालकांना अनेकदा वाटते की, कधीतरी एक-दोन घोट प्यायल्याने काही नुकसान होणार नाही, पण हे थेट मुलांच्या आरोग्यावर परिणाम करते.

चहा-कॉफीमध्ये असलेले कॅफिन मुलांच्या शरीरावर मोठ्यांपेक्षा जास्त परिणाम करते. खरं तर, मुलांचे मेंदू आणि मज्जासंस्था अजून विकसित होत असते. अशा परिस्थितीत कॅफिन त्यांच्या झोप, भूक, वर्तन आणि एकाग्रतेवर परिणाम करते. याचा परिणाम लगेच दिसत नाही, पण दीर्घकाळात यामुळे गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.

तर चला, आज कामाच्या बातमी मध्ये आपण मुलांना चहा-कॉफी देण्याच्या नुकसानीबद्दल बोलूया. यासोबतच जाणून घेऊया की-

कॅफिन काय आहे आणि ते आरोग्यावर कसे परिणाम करते?

लहान मुलांमध्ये कॅफिनच्या अतिसेवनाची काय लक्षणे असू शकतात?

चहा-कॉफीमध्ये अनेक नैसर्गिक रासायनिक संयुगे (केमिकल कंपाउंड्स) आढळतात. यापैकी सर्वात प्रमुख कॅफिन आहे, जे एक उत्तेजक (स्टिमुलंट) पदार्थ आहे. चहामध्ये कॅफिनसोबत टॅनिन आणि फ्लेव्होनॉइड्स (वनस्पतींमध्ये आढळणारी संयुगे) असतात. तर कॉफीमध्ये कॅफिन, क्लोरोजेनिक ॲसिड आणि काही नैसर्गिक तेल (नॅचरल ऑइल्स) असतात.

याशिवाय, यामध्ये थोड्या प्रमाणात खनिजे (मिनरल्स) आणि अँटीऑक्सिडंट्स देखील असतात. हे घटक मोठ्यांसाठी काही प्रमाणात सुरक्षित आहेत, परंतु लहान मुलांसाठी यामध्ये असलेले कॅफिन आणि टॅनिन हानिकारक असतात.रात्री झोप येण्यासाठी एडेनोसिन नावाचे रसायन जबाबदार आहे. दिवसभर एडेनोसिन बाहेर पडते, ज्यामुळे एका विशिष्ट बिंदूनंतर रात्री आपल्याला झोप येते. पण काय होईल, जर एडेनोसिन बाहेर पडले, पण मेंदूतील त्याचे रिसेप्टर्स ब्लॉक केले गेले? यामुळे आपल्याला झोप येणार नाही.कॅफिन हेच काम करते. ते एडेनोसिन रिसेप्टर्सना ब्लॉक करते, ज्यामुळे आपल्याला सतर्क वाटते. ही एक प्रकारची ताजेपणाची भावना देखील असते. पण कॅफिनचा प्रभाव कमी होताच, अचानक थकवा जाणवू लागतो.

यासोबतच कॅफिन मज्जासंस्थेला उत्तेजित करते, ज्यामुळे हृदयाचे ठोके आणि श्वास घेण्याची गती वाढते. एकूणच, कॅफिन तात्पुरते ऊर्जा वाढवते, पण त्यानंतर थकवा, अस्वस्थता आणि निद्रानाश यांसारख्या समस्या उद्भवतात.प्रश्न- मुलांचे शरीर विकासाच्या टप्प्यात असल्यामुळे कॅफिन त्यांच्या शरीरावर कसा परिणाम करते?

### भारतात 13 कोटी लोकांची किडनी खराब:प्रकरणे वेगाने का वाढत आहेत



CKD म्हणजे क्रॉनिक किडनी डिसीज. या आजाराच्या बाबतीत आपला देश जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या क्रमांकावर चीन आहे. भारतातही हृदयविकारानंतर हा दुसरा सर्वात मोठा आजार आहे. हेल्थ जर्नल द लॅन्सेटमध्ये प्रकाशित झालेल्या एका जागतिक अभ्यासानुसार, 2023 मध्ये भारतात सुमारे 13.8 कोटी लोकांना क्रॉनिक किडनी डिसीज होता.

जगभरात हा आजार 2023 मध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी नववे सर्वात मोठे कारण ठरला. यामुळे जगभरात सुमारे 15 लाख लोकांचा मृत्यू झाला.

क्रॉनिक किडनी डिसीज अचानक होत नाही. यासाठी कोणताही विषाणू किंवा जिवाणू जबाबदार नाही. हे दीर्घकाळ खराब चयापचयाचा (मेटाबॉलिज्म) परिणाम आहे. याचा अर्थ या आजारापासून बचाव करता येतो.म्हणून 'फिजिकल हेल्थ' मध्ये आज आपण क्रॉनिक किडनी डिसीज काय आहे हे जाणून घेणार आहोत. यासोबतच आपण हे देखील जाणून घेणार आहोत की-भारतात हा आजार का वाढत आहे?

किडनीशिवाय जीवन शक्य नाही का?

किडनीला निरोगी कसे ठेवता येते?

क्रॉनिक किडनी डिसीज (CKD) मध्ये 'क्रॉनिक' या शब्दाचा अर्थ असा आहे की मूत्रपिंडाची समस्या हळूहळू आणि दीर्घकाळ वाढत आहे. यामुळे मूत्रपिंड आपले कार्य, म्हणजे रक्त शुद्ध करणे आणि शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर काढणे, व्यवस्थित करू शकत नाही.

# लक्ष्मीकांत बेर्डेंच्या लेकानेही जिंकलं प्रेक्षकांचं मन, 'उत्तर' सिनेमाची अभिनयला मिळाली पोच पावती

मुंबई - सध्या अभिनय बेर्डेच्या 'उत्तर' या मराठी सिनेमाची चर्चा सर्वत्र सुरू आहे. 'उत्तर' या सिनेमाला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळतोय. हा सिनेमा 'धुरंधर' हा सिनेमाला बॉक्स ऑफिसवर टक्कर देताना दिसतोय.

आई आणि मुलाच्या नात्यावर आधारित असलेल्या या सिनेमानं प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. 'उत्तर' या सिनेमाचे शोसुद्धा हाऊसफुल्ल होत आहेत. अशातच आता सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करण्यात आलाय. या व्हिडिओमध्ये अभिनय बेर्डेला त्याच्या कामाची पोच पावती मिळताना दिसतेय.

झी स्टुडिओज, जॅकपॉट एंटरटेनमेंट निर्मित व क्षितिज पटवर्धन दिग्दर्शित 'उत्तर' हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. चित्रपटाची कथा प्रेक्षकांना आवडत असून प्रेक्षक भावुक होत आहेत व कलाकारांचे कौतुक करत आहेत. सध्या या चित्रपटाची थिएटर विझिट सुरू असून यादरम्यान एका महिलेने अभिनय बेर्डेचे कौतुक करत त्याला त्याच्या कामाची पोच पावती दिली.

'उत्तर' सिनेमाच्या स्क्रिनिंगदरम्यान सिनेमातील कलाकारांनी थिएटरमध्ये उपस्थित राहून प्रेक्षकांना खास सरप्राईज दिलं. हा सिनेमा पाहून भारावलेल्या एका महिला प्रेक्षकाने अभिनय बेर्डेला बक्षीस म्हणून ५०० रुपयांची नोट दिली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. प्रेक्षक महिला अभिनयचं कौतुक करताना दिसतेय. ती अभिनयच्या हातात ५०० रुपयांची नोट देते. हे पाहून अभिनयलाही आश्चर्य वाटतं.

अभिनय त्या महिलेला नमस्कार करत त्यांचे आशीर्वाद घेताना दिसतोय. वडिलांप्रमाणेच अभिनयनेही चाहत्यांच्या मनात स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे.

व्हिडिओच्या शेवटी अभिनय म्हणतोय की, 'वर्षाचा पहिला दिवस...आमची पहिली थिएटर भेट आणि प्रेक्षकांकडून मिळालेली ही पहिली पावती... प्रेक्षकांकडून मिळालेली पहिली कमाई... बस अजून काय हवं?' व्हिडिओवर नेटकऱ्यांनी, 'हाच खरा आशीर्वाद', 'अजून छान चित्रपट मिळूदे या वर्षात' अशा कमेंट्स केल्या आहेत.



## नववर्षाच्या निमित्ताने ईशाला वडील धर्मेंद्र यांची आठवण आली

### 'लव यू पापा' असे लिहून आकाशाकडे केला निर्देश

नवीन वर्षाच्या 2026च्या सुरुवातीला, बॉलिवूड अभिनेत्री ईशा देओलने आपले दिवंगत वडील, दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांना आठवून एक भावनिक पोस्ट शेअर केली. दुबईतून तिने इंस्टाग्रामवर दोन फोटो पोस्ट केले, जे वेगाने व्हायरल होत आहेत. पहिल्या फोटोत ती काळ्या-गोल्डन पोशाखात आकाशाकडे बोट दाखवताना दिसत आहे, तर दुसऱ्या फोटोत चंद्राजवळच्या ताऱ्यावर 'लव्ह यू पापा' आणि हार्ट इमोजी लिहिलेले आहे.

कॅप्शनमध्ये ईशा देओलने लिहिले आहे, 'स्टे ब्लेस्ड, हॅपी, हेल्दी अँड स्ट्रॉंग... मजबूत राहा, निरोगी राहा, आनंदी राहा.' ही पोस्ट तिचा भाऊ बॉबी देओललाही भावली, ज्यांनी हार्ट इमोजीने प्रतिक्रिया दिली. कमेंट सेक्शनमध्ये चाहते कुटुंबाला शुभेच्छा देत आहेत आणि धर्मेंद्र यांच्या आठवणीत भावुक होत आहेत.



धर्मेंद्र यांचे निधन २४ नोव्हेंबर २०२५ रोजी झाले होते. ते बऱ्याच काळापासून वयोमानानुसार येणाऱ्या आजारांशी झुंज देत होते, श्वास घेण्यास त्रास झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि नंतर घरी उपचार सुरू होते.

नुकताच धर्मेंद्र यांचा शेवटचा चित्रपट 'इक्कीस' थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. धर्मेंद्र यांच्या निधनानंतर ही त्यांची पडद्यावरील शेवटची उपस्थिती आहे, जे त्यांच्या चाहत्यांसाठी एक अत्यंत भावनिक क्षण बनले आहे. या चित्रपटात धर्मेंद्र एमएल खेत्रपाल यांच्या भूमिकेत आहेत जे परमवीर चक्राने सन्मानित भारताचे सर्वात कमी वयाचे योद्धा, द्वितीय लेफ्टनंट अरुण खेतपाल यांचे वडील होते.

## स्वत:चा AI जनरेटेड बनावट फोटो पाहून जावेद अख्तर संतापले

लोकप्रिय गीतकार जावेद अख्तर यांचा नुकताच एक फोटो व्हायरल झाला होता, ज्यात ते टोपी घातलेले दिसले होते. या फोटोसोबत दावा करण्यात आला की आता जावेद अख्तर धार्मिक झाले आहेत. आता बनावट फोटो समोर आल्यानंतर गीतकार संतापले आहेत आणि त्यांनी याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचीही घोषणा केली आहे.

जावेद अख्तर यांनी गुरुवारी त्यांच्या अधिकृत X अकाउंटवरून (पूर्वीचे ट्विटर) संतापून पोस्ट शेअर करत लिहिले आहे, पुढे जावेद अख्तर यांनी लिहिले आहे की, 'मी या प्रकरणाबाबत खूप गंभीर आहे आणि या खोट्या बातमीची तक्रार सायबर पोलिसांत दाखल करण्यावर गंभीरपणे विचार करत आहे. तसेच, जो कोणी या खोट्या व्हिडिओला बनवण्यासाठी आणि पसरवण्यासाठी जबाबदार आहे, आणि ज्या लोकांनी तो पुढे पाठवला आहे, त्यांच्याविरुद्ध माझी प्रतिमा, प्रतिष्ठा आणि विश्वासार्हतेला हानी पोहोचवल्याबद्दल कायदेशीर कारवाई करून त्यांना न्यायालयात खेचण्याचा माझा इरादा आहे.'

जावेद अख्तरच्या टोपी घातलेल्या फोटोसोबत धार्मिक झाल्याचे दावे तेव्हा करण्यात आले, जेव्हा जावेद अख्तर तो वादविवाद हरले, ज्यात त्यांनी शमाइल नदवी यांच्यासोबत देवाचे अस्तित्व आहे की नाही यावर चर्चा केली. जावेद अख्तर या बाजूने होते की देवाचे अस्तित्व नाही, तर विद्वान मुफ्ती शमाइल नदवी देवाचे अस्तित्व असल्याच्या बाजूने होते.



दोघांमध्ये दीर्घ चर्चा झाली, त्यानंतर विद्वान शमाइल नदवी यांनी आपल्या युक्तिवादांनी जावेद अख्तर यांना वादविवादात हरवले.

## लोकप्रिय अभिनेत्याचा 25 वर्षाचा संसार मोडला; म्हणाला,

मुंबई - सुप्रसिद्ध मल्याळम अभिनेते मनू वर्मा आणि त्यांची पत्नी सिंधू वर्मा यांचा घटस्फोट होणार आहे. २५ वर्षांच्या संसारानंतर अभिनेता घटस्फोट घेणार आहे. दोन वर्षांपासून हे जोडपं वेगळं राहतंय. न्यायालयात सध्या घटस्फोटाची केस सुरू आहे. मनू वर्मा हे ज्येष्ठ अभिनेते जगन्नाथ वर्मा यांचे पुत्र आहेत.

'मुव्ही वर्ल्ड' मीडियाला दिलेल्या मुलाखतीमध्ये मनू वर्मा म्हणाले की, 'मी आणि माझी पत्नी वेगळे राहत आहोत. मात्र, आमचा अजून कायदेशीर घटस्फोट झालेला नाही. आम्ही पुन्हा एकत्र येण्याची शक्यता खूपच कमी आहे. आम्ही प्रेमात पडलो आणि त्यानंतर एकत्र आयुष्य जगत होतो, असं म्हणण्याला आता काहीच अर्थ उरलेला नाही. कारण आमच्यापेक्षा जास्त एकमेकांवर प्रेम असणारी आणि एकत्र राहिलेली अनेक जोडपी विभक्त झाली आहेत. खरं तर किमान दोन-तीन वर्षांपर्यंत आम्ही प्रेमात होतो आणि एकत्र होतो. पण नात्यात दुरावा यायला जास्त वेळ लागत नाही.'

'जेव्हा नात्यात एकमेकांशी जुळवून घेणं शक्य नसतं, तेव्हा वेगळं होणंच चांगलं. उगाच एकत्र राहून संघर्ष करायची गरज नाही. एकत्र राहिल्यानं अडचणी आणखी वाढल्या तर? तसं का करायचं? त्यापेक्षा वेगळं व्हायचं. परदेशात असंच असतं. तिथे वेगळं झाल्यानंतरही लोक मैत्री टिकवून ठेवतात. आपल्याकडे तसं झालं तर चांगलं. पण तसं झाल्यास कदाचित घटस्फोटांचं प्रमाण वाढेल. वेगळं झालेल्या लोकांनी मैत्री टिकवून ठेवण्यात काहीच गैर नाही. पण केरळमध्ये तसं नाही. एकदा लोक वेगळे झाले की, त्यांच्यातलं सगळं संपतं.' असं मनू वर्मा यांनी पुढे सांगितलं.

दरम्यान, मनू वर्मा यांच्या कामाबद्दल सांगायचं तर त्यांनी 'पुक्कलम वरवाई', 'कदमत्ताथु कथनार', 'कुमकुमाचेप्पू' यांसारख्या मालिकांमध्ये काम केलं आहे. त्याचबरोबर त्यांनी 'निलगिरी', 'अपूर्वम चिल्लर', 'भूमिका', 'द वॉरंट' यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलंय. तसंच त्यांची पत्नी सिंधू वर्मा यांनी, 'पंचाग्नी', ''इथो जन्म कल्पनातील' यांसारख्या मालिकांमध्ये काम केलं आहे.

## दीपिकाला दाखवला बाहेरचा रस्ता, आता संदीप रेड्डी वांगांच्या Spirit मध्ये झाली 'नॅशनल क्रश'ची एन्ट्री, ओळखलं का तुम्ही?

मुंबई: कामांच्या तासांवरून अभिनेत्री दीपिका पादुकोण आणि दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांच्यात झालेल्या मतभेदांमुळे 'स्पिरिट' या सिनेमाची बरीच चर्चा झाली. संदीपनं सोशल मीडियावर त्याविषयी जाहीरपणे पोस्ट लिहिल्यावर तर हा वाद आणखी चिघळला. दीपिकानं सिनेमा सोडल्याचंही समजलं. बॉलिवूडमधून वेगवेगळी मतं समोर आली. अनुभवी, ज्येष्ठ मंडळीही त्यावर व्यक्त होऊ लागली. काही दिवसांनी दीपिकाची जागा तृप्ती डिमरीनं घेतल्याचं जाहीर झालं. तेव्हापासून या सिनेमाविषयीचं कुतूहल वाढलं होतं. चाहत्यांना अखेर त्याची पहिली झलक बघायला मिळाली आहे. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी या सिनेमाचं पहिलं पोस्टर

प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. प्रभास आणि तृप्ती डिमरी असलेल्या या पोस्टरची चर्चा आहे. हे दोघंही पूर्णपणे पोस्टरमध्ये दिसत नसले, तरी सिनेमाचा विषय गंभीर असल्याचं बोललं जातंय. लांब केस आणि फिटनेस यामुळे प्रभासच्या लूकचीही चर्चा आहे. 'ॲनिमल' या सुपरहिट ठरलेल्या सिनेमानंतर संदीप पुन्हा एकदा वेगळाच विषय घेऊन येण्यास सज्ज झाला आहे. या सिनेमात प्रभास आणि तृप्तीसह विवेक ओबेरॉय, प्रकाश राज आणि ज्येष्ठ अभिनेत्री कंचना हे कलाकारही आहेत. सिनेमाची प्रदर्शनाची तारीख अद्याप ठरली नसली, तरी याच वर्षी हा सिनेमा येणार असल्याचं बोललं जातंय.

तर दीपिका पदुकोण या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार होती. मात्र, काही व्यावसायिक अटींमुळं तिनं या सिनेमातून माघार घेतली,



## कुणाल खेमू आणि वडिलांविरुद्ध फसवणुकीची तक्रार:आरोप- साइनिंग अमाउंट घेऊन चित्रपटास नकार दिला, मुंबई न्यायालयाने पोलिसांकडून मागितले उत्तर

अभिनेता कुणाल खेमू आणि त्यांचे वडील रवी खेमू यांच्या विरोधात मिळालेल्या फसवणुकीच्या तक्रारीनंतर मुंबईतील एका न्यायालयाने अंबोली पोलिसांकडून उत्तर मागितले आहे. अभिनेता आणि त्यांच्या वडिलांवर आरोप आहे की, त्यांनी एका निर्मात्याकडून चित्रपटात काम करण्यासाठी साइनिंग अमाऊंट घेतले होते, मात्र नंतर त्यांनी एकत्र काम करण्यास नकार दिला आणि अधिक पैशांची मागणी करू लागले.

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी सुजीत कुमार सी. तायडे यांनी 29 डिसेंबर रोजी तक्रार मिळाल्यानंतर संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून भारतीय नागरी संरक्षण संहिता कलम 175 (3) अंतर्गत उत्तर मागितले आहे. आदेशात त्यांनी म्हटले आहे की, अंबोली पोलीस ठाण्याच्या प्रभारींना याप्रकरणी उत्तर द्यावे लागेल.

खरं तर, 2024 मध्ये चित्रपट निर्माता रवी दुर्गाप्रसाद अग्रवाल यांनी ॲडव्होकेट वेदिका चौबे यांच्यामार्फत अभिनेता कुणाल खेमू आणि त्यांचे वडील रवी खेमू यांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. निर्माता रवी दुर्गाप्रसाद 'ओव्हरटेक' नावाचा एक हिंदी चित्रपट बनवत होते, ज्यात मुख्य भूमिका साकारण्यासाठी त्यांनी कुणाल खेमू यांच्याशी संपर्क साधला होता. कुणालने चित्रपटाची कथा ऐकली होती आणि स्क्रिप्ट आवडल्यानंतर त्याने चित्रपट करण्यास संमती दिली होती. चर्चेनंतर निर्मात्याने कुणाल खेमूला साइनिंग अमाऊंट म्हणून 21 लाख रुपये दिले होते. यानंतर कुणाल आणि त्याचे वडील चित्रपट सुरू करण्याऐवजी आणखी पैसे मागू लागले, ज्यामुळे चित्रपट पुढे बनू शकला नाही आणि निर्मात्याला मोठे नुकसान झाले.

यापूर्वीही तक्रार दाखल केली होती

2024 मध्ये नोंदवलेल्या तक्रारीपूर्वी, निर्मात्याने 2014 मध्येही कुणाल आणि त्याच्या वडिलांविरुद्ध न्यायालयात याचिका दाखल केली होती, मात्र 2017 मध्ये हे प्रकरण रद्द करण्यात आले होते. त्यांनी 2024 मध्ये नवीन तक्रार दाखल केली, ज्यात पैसे परत करण्याची मागणी केली. जेव्हा हा समझोता होऊ शकला नाही, तेव्हा त्यांनी अभिनेता आणि त्याच्या वडिलांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्याचा निर्णय घेतला.



## अर्थविश्व...

### बादशाह सिद्धार्थ भैय्यांचं निधन, तब्बल 2800% रिटर्नचा रेकॉर्ड, गुंतवणूक क्षेत्रावर शोककळा



गुंतवणूक क्षेत्रातील एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. इक्विटस इन्व्हेस्टमेंट कन्सल्टन्सीचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक Siddharth Bhaiya यांचे 31 डिसेंबर 2026 रोजी न्यूझीलंडमध्ये सुट्टीवर असताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते केवळ 47 वर्षांचे होते. त्यांच्या अचानक जाण्याने भारतीय शेअर बाजार आणि गुंतवणूक समुदायात शोककळा पसरली आहे.

स्मॉल कॅप हंटर सिद्धार्थ भैया

सिद्धार्थ भैया यांना 'स्मॉल-कॅप मल्टीबॅगर हंटर' म्हणून ओळखले जायचे. याचा अर्थ ते अशा लहान कंपन्या शोधून काढायचे, ज्या भविष्यात खूप मोठी वाढ दाखवतील आणि त्यांच्यात दीर्घकाळ गुंतवणूक करून मोठा नफा मिळवायचे. त्यांनी अगदी सुरुवातीच्या टप्प्यातच चांगल्या वाढीची क्षमता असलेल्या कंपन्या ओळखण्याची आणि त्यांच्यावर विश्वास ठेवण्याची एक खास कला विकसित केली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली एक्विटास दलाल स्ट्रीटवरील एक अत्यंत महत्त्वाचे PMS प्लॅटफॉर्म बनले. ही फर्म PMS आणि अल्टरनेटिव्ह इन्व्हेस्टमेंट फंड (AIF) स्ट्रॅटेजीमध्ये सुमारे रु,७०० कोटी रुपयांचे व्यवस्थापन करत होती.

सिद्धार्थ भैया हे चार्टर्ड अकाउंटंट (CA) होते. त्यांनी 2012 मध्ये एक्विटासची स्थापना केली होती. याआधी त्यांनी निप्पॉन इंडिया म्युच्युअल फंडमध्ये सुमारे सात वर्षे फंड मॅनेजर म्हणून काम केले होते. त्यांचे सहकारी त्यांना एक अत्यंत विश्लेषणात्मक आणि वेगळा विचार करणारे गुंतवणूकदार म्हणून ओळखत होते. ते वाढीव क्षमता असलेल्या स्टॉक्समध्ये गुंतवणूक करताना, कंपनीची आर्थिक स्थितीही मजबूत आहे की नाही, हे पाहत असत. त्यांच्या गुंतवणुकीच्या धोरणाचा मुख्य आधार म्हणजे सखोल संशोधन करणे, मजबूत आर्थिक स्थिती असलेल्या कंपन्या निवडणे, ज्यांचे व्यवसाय मॉडेल वाढण्यास सोपे असेल आणि संयमाने पैसे गुंतवणे. भैया हे बाजारातील अल्पकालीन चढ-उतारांकडे दुर्लक्ष करून, चांगल्या कंपन्यांमध्ये अनेक वर्षांपर्यंत गुंतवणूक टिकवून ठेवण्यासाठी ओळखले जात होते.

गेल्या काही वर्षांपासून भारतीय शेअर बाजार, विशेषतः स्मॉल आणि मिड-कॅप स्टॉक्स, विक्रमी उंचीवर पोहोचले होते. अशा वेळी, सिद्धार्थ भैया हे दलाल स्ट्रीटवरील सर्वात सावध आवाजांपैकी एक होते. त्यांनी वारंवार इशारा दिला होता की कंपन्यांचे मूल्यांकन (valuation) खूप जास्त वाढत आहे आणि गुंतवणूकदारांचा उत्साह कंपन्यांच्या खऱ्या आर्थिक क्षमतेपेक्षा जास्त आहे. गेल्या महिन्यात, त्यांनी सध्याच्या बाजारातील तेजीला 'हेल्दी बुल' ऐवजी 'बुडबुडा' म्हटले होते. त्यांनी गुंतवणूकदारांना अपेक्षा कमी ठेवण्याचे आणि दीर्घकालीन, रिस्क एडजस्टेड परताव्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले होते.सिद्धार्थ भैया यांचे अचानक जाणे हे भारतीय गुंतवणूक समुदायासाठी एक मोठी हानी आहे. त्यांनी अनेक गुंतवणूकदारांना योग्य कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून चांगला नफा मिळविण्यात मदत केली होती.

### कधी 10988 रुपयांचा होता स्टॉक, काही वेळातच बदलले चित्र, आता 2,192 रुपयांवर, मंदीत संधी साधण्याची हीच वेळ?



शेअर मार्केटमध्ये शुक्रवारी, आठवड्याच्या शेवटच्या व्यापार दिवशी, तब्बल 10,000 रुपये किंमत असलेला शेअर अचानक 80 टक्क्यांनी घसरणीसह 2 हजार रुपयांवर कोसळला. शुक्रवारी मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया किंवा MCX शेअर जवळजवळ 80% घसरला ज्यामुळे या शेअर्सची किंमत 10,988.60 रुपयांवरून 2,192२ रुपयांवर आली. पण थांबा शेअर्स विकायची घाई करू नका कारण गुंतवणूकदारांना काळजी करण्याची गरज नाही. एमसीएक्सचे 'स्टॉक स्प्लिट' करण्यात आले आहेत. ही मोठी घसरण स्टॉकच्या रेकॉर्ड डेटवर झाली, जी 5:1 स्टॉक स्प्लिटसाठी सेट केली गेली होती. त्याचवेळी, बाजाराच्या सुरुवातीला स्टॉक स्प्लिट झाल्यावर आता MCX शेअर्स तेजीत आले आहेत. सध्या एमसीएक्स शेअर्स 2,236 रुपयांवर व्यवहार करत आहेत. एमसीएक्सने फक्त तीन महिन्यांत गुंतवणूकदारांना 40% पेक्षा जास्त परतावा दिला असून गेल्या वर्षभरात शेअरमध्ये 78% वाढ झाली असताना सध्या कंपनीचे मार्केट कॅप 56000 कोटींवर पोहोचले आहे. एखाद्या कंपनीने स्टॉक स्प्लिट केल्यावर पोर्टफोलिओमधील शेअर्सची संख्या वाढते तर, किंमत कमी होते, ज्यामुळे कंपनीचे एकूण गुंतवणूक मूल्य आणि बाजार भांडवल बदलत नाही. स्टॉक स्प्लिटच्या रेकॉर्ड डेटवर ही मोठी घसरण काही गुंतवणूकदारांना आश्चर्यचकित करू शकते, पण ही शेअरच्या किमतीतील सुधारणा नाही तर समायोजन म्हणजे अडजस्टमेंट आहे.शुक्रवारी 10 रुपये दर्शनी मूल्याचे शेअर्स आज 2 रुपयाच्या दर्शनी मूल्याच्या शेअर्समध्ये रूपांतरित झाले. म्हणजे की एक MCX शेअर 5 भागात विभागाला गेला. अशाप्रकारे, ज्यांच्याकडे आधीच एक MCX शेअर होता त्यांच्या पोर्टफोलिओत आता 5 शेअर्स झाले असतील पण, त्यांची गुंतवणूक रक्कम तितकीच राहिली असून एका शेअरचे मूल्य 5 समान भागांमध्ये विभागण्यात आले आहे.

### 'पोस्टर बॉय' बनला 'बॅड बॉय'! कॉमर्स ग्रॅज्युएट 'जेंटलमन' राजूने गुंतवणूकदारांचा केला विश्वासघात!



भारतात आजवर अनेक घोटाळे झाले आहेत, ज्यात भारतीय शेअर बाजाराचाही समावेश असून या घोटाळ्यांपैकी सत्यम घोटाळा एक महत्त्वाचे प्रकरण राहिले, ज्यामुळे गुंतवणूकदारांना लाखोंचे नुकसान झाले. 2009 मध्ये 7000 कोटींचा घोटाळा उघडकीस आल्यानंतर रामलिंग राजू आता गुमनाम झाले आहेत. वाणिज्य पदवीधर असलेल्या राजूने देशातील चौथी सर्वात मोठी आयटी कंपनी उभारली. 2009 मध्ये सत्यम घोटाळा उघडकीस आल्यानंतर रामलिंग राजू अचानक चर्चेचा आणि बदनामीचा विषय बनला. रामलिंग राजूने त्यावेळी इन्फोसिस, विप्रो आणि टीसीएस यासारख्या आघाडीच्या आयटी कंपन्यांपैकी असलेल्या सत्यम कॉम्प्युटर्सची स्थापना केली होती. 2009 मध्ये त्याने कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात अकाउंटिंग फसवणूक केल्याची कबुली दिली, ज्यामुळे या आयटी दिग्गज कंपनीतील एक मोठा घोटाळा उघडकीस आला. या प्रकरणानंतर रामलिंगा राजू अज्ञातवासात गेले आणि आता 15 वर्षांनंतर, एका माहितीपटामुळे त्याचे नाव प्रसिद्धीझोतात आले. डिसेंबर 2025 मध्ये नेटफ्लिक्सच्या 'बॅड बॉय बिलियनेअर्स' या माहितीपटाचा एक भाग प्रदर्शित झाला, जो बी. रामलिंग राजूच्या हाय-प्रोफाइल सत्यम घोटाळ्यावर आधारित आहे.

# भारतीयांचा राग असलेल्या देशातच टीम इंडियाचा दौरा, BCCI कडून वेळापत्रक जाहीर, चाहते भडकणार अन् प्रकरण..



नवी दिल्ली : बीसीसीआयचं नेमकं चाललंय तरी काय, असा प्रश्न आता चाहत्यांना पडला आहे. कारण आता नवीन वर्षांत त्यांनी जो निर्णय घेतला आहे, तो त्यांच्या चांगलाच अंगलट येऊ शकतो. कारण भारतीयांना ज्या देशावर राग आहे, त्यांच्याबरोबरच आता बीसीसीआयने भारताचा दौरा ठरवला आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात एवढं वैमनस्य आहे की, बीसीसीआय आपला संघ त्यांच्या देशात पाठवणार नाही. काही दिवसांपूर्वी चॅम्पियन्स ट्रॉफी झाली होती. या चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद हे पाकिस्तानकडे होतं. पाकिस्तान भारताला आपल्या देशात क्रिकेट खेळायला आमंत्रित करत होता. पण भारताने त्यांचं काही एक ऐकलं नाही. भारताने आपला निर्णय कायम ठेवला आणि त्यांनी आपले सामने दुबईत खेळले. पण आता भारताने एक मोठी निर्णय घेतला आहे. ज्या देशावर चाहत्यांचा सर्वात जास्त रोष आहे, त्या देशातच आहे बीसीसीआयला आपला संघ पाठवणार असल्याचे समोर आले आहे. बीसीसीआयने नवीन वर्षाचे वेळापत्रक जाहीर केले. या वेळापत्रकात बीसीसीयने एक मोठा निर्णय घेतला आहे, जो त्यांच्या चांगलाच अंगाशी येऊ शकतो. सध्या बांगलादेशात हिंदू व्यक्तींना निर्दयीपणे मारले जात आहे. त्यामुळे भारतीय नागरिक बांगलादेशवर चांगलेच भडकलेले आहेत. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंनाही भारतामध्ये विरोध होऊ शकतो. पण बीसीसीआयने आता बांगलादेशच्या दौऱ्यावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. या दौऱ्यात भारत बांगलादेशबरोबर तीन वनडे आणि तीन टी २० सामने खेळणार आहे. भारताचा पहि वनडे सामना हा १ सप्टेंबरला होणार आहे, त्यानंतर दुसरा वनडे सामना हा ३ आणि तिसरा वनडे सामना हा ६ सप्टेंबरला खेळवण्यात येणार आहे. त्यानंतर लगेच टी २० मालिकाही होणार आहे. या मालिकेतील पहिला टी २० सामना हा ९ सप्टेंबरला खेळवण्यात येणार आहे. त्यानंतर भारताचा दुसरा टी २० सामना हा १२ सप्टेंबरला होईल, त्यानंतर तिसरा आणि अखेरचा सामना हा १३ सप्टेंबरला खेळवला जाणार आहे. पण भारतीयांचा बांगलादेशबद्दलचा रोष पाहता हे प्रकरण त्यांच्या चांगलंच अंगलट येऊ शकतं, असे म्हटलं जात आहे.

## रोहित आणि विराटला BCCI देणार अजून एक मोठा धक्का

नवी दिल्ली : रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनाही बीसीसीआयने गेल्या वर्षी धक्के दिले आहेत. पण आता नवीन वर्षात बीसीसीआय त्यांना अजून एक मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे.

रोहित शर्माकडून बीसीसीआयने गेल्ययावर्षी कसोटी संघाचे कर्णधारपद काढून घेतले, त्यानंतर त्याला कसोटी संघाबाहेर केले. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. पण तरीही रोहित शर्माला वनडे कॅप्टन्सीवरून काढून टाकले. विराट कोहलीलाही बीसीसीआयने कसोटी संघामधून बाहेरचा रस्ता दाखवला या दोघांना फक्त वनडे क्रिकेट खेळायला सांगितले आणि तिथेही त्यांच्या डोक्यावर त्यांनी टांगती तलवार ठेवली. आता नवीन वर्षात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना बीसीसीआय अजून एक मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे. ऑस्ट्रेलियातील मालिका गमावल्यावर बीसीसीआयने देशांतर्गत सामन्याची कठोर सक्ती केली. त्याचे पालनही विराट आणि रोहितने केले. मात्र, इंग्लंडविरुद्धची मालिका काही दिवसांवर असताना त्यांनी कसोटीचा निरोप घेतला होता.भारतीय क्रिकेट बोर्डाच्या (बीसीसीआय) वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नव्या मोसमासाठीचे करारबद्ध खेळाडू निश्चित करण्याच्या दृष्टीने विचार सुरू केला आहे. त्यात अर्थातच कोणाला बढती आणि कोणाची पीछेहाट याचाही विचार होत आहे. केवळ मर्यादित षटकांच्याच लढती खेळत असलेल्या विराट कोहली आणि रोहित शर्माला कराराद्वारे देण्यात येणारी रक्कम कमी होण्याची शक्यता आहे. विराट आणि रोहितचा 'अ' प्लस गटात सध्या समावेश आहे. त्यात कसोटी, टी-२० आणि वन-डे प्रकारासाठी उपलब्ध असलेल्या खेळाडूंनाच स्थान दिले जाते. त्यांना वर्षाला सात कोटी देण्यात येतात. ही गटवारी २०१८पासून सुरू झाली. विराट त्यात सुरुवातीपासून आहे. मात्र, आता सर्व प्रकारात खेळत नसल्यामुळे त्यांना 'अ' गटात स्थान देण्याचा विचार होत आहे. आता विराट तसेच रोहित खालच्या गटात येण्याची शक्यता आहे. रोहित आणि विराट यांना हा एक मोठा धक्काच असेल. त्यामुळे त्यांना कमी रकमेचा करार देण्याचा निर्णय बीसीसीआयने घेतला असल्याचे समजते. अर्थात याबाबत सखोल मंथन सुरू आहे.नव्या कराराची घोषणा काही दिवसांत अपेक्षित आहे. त्या कराराबरोबरच देशांतर्गत स्पर्धेत खेळणाऱ्या खेळाडूंच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णयही अपेक्षित आहे. त्याचबरोबर सामनाधिकारी आणि पंचांचे उत्पन्नही वाढण्याची शक्यता आहे.



## अर्जुन तेंडुलकरबद्दल योगराज सिंग यांचं धक्कादायक वक्तव्य



नवी दिल्ली : योगराज सिंग हे कधी काय बोलतील, याचा नेम नाही. आता तर योगराज सिंग यांनी अर्जुन तेंडुलकरबाबत एक मोठं आणि धक्कादायक वक्तव्य केलं आहे. योगराज याचं हे वक्तव्य असं आहे की, कोणीही कपाळावर हात मारून घेईल.

अर्जुन तेंडुलकरचं काहीच चागलं होत नव्हतं. त्यामुळे सचिन तेंडुलकर यांनी अर्जुनला योगराज सिंग यांच्याकडे प्रशिक्षणासाठी पाठवलं. योगराज सिंग हे कडक शिस्तीचे आहेत, कोणताही खोडसाळपणा त्यांना चालत नाही. योगराज यांनी अर्जुन तेंडुलकरकडून अथक मेहनत करून घेतली. योगराज यांनी अर्जुनला फक्त क्रिकेटचे धडे दिले नाहीत तर त्याची मानसीकताही सुधारली. त्यामुळे अर्जुन तेंडुलकरच्या क्रिकेटमध्ये अमुलाग्र मोठा बदल झाला. पण आता मात्र योगराज यांनी अर्जुन तेंडुलकरबाबत एक धक्कादायक वक्तव्य केलं आहे.

अर्जुन तेंडुलकर हा विजय हझारे ट्रॉफीमध्ये मुंबईच्या संघाविरुद्ध सलामीला आला होता. त्यानंतर त्याच्या फलंदाजीची चर्चा सुरु झाली. आता योगराज सिंग यांनी अर्जुन तेंडुलकरच्या फलंदाजीबाबत एक मोठं वक्तव्य केलं आहे. योगराज यांनी आता अर्जुन तेंडुलकरची तुलना एका दिग्गज क्रिकेटपटूशी केली आहे.

## इंडियाला 2026 गाजवायचं असेल तर तीन गोष्टींवर करावं लागणार काम,



मुंबई : भारतीय क्रिकेटसाठी २०२६ वर्ष अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या वर्षात भारतीय संघाला टी२० विश्वचषक खेळायचा आहे, तसेच काही कसोटी सामनेही खेळायचे आहेत. मात्र, या वर्षातील बहुतांश वेळ भारतीय संघ पांढऱ्या चेंडूच्या सामन्यांमध्ये व्यस्त राहणार आहे. त्यामुळे भारतीय संघासमोर अनेक आव्हाने आहेत. यापैकी तीन प्रमुख आव्हान ज्यावर तोडगा काढावाच लागणार आहे.

टीम इंडियाचे टी२० कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्यासाठी २०२५ चा शेवट आकडेवारीनुसार खूपच खराब ठरला. २०२६ च्या टी२० विश्वचषकापूर्वी सूर्याचा फॉर्म संघासाठी एक मोठ कोडं बनलं आहे. मागील १६-१७ डावांमध्ये त्यांची सरासरी १५ च्या आसपास राहिला आहे आणि त्याच्या बॅटमधून कोणतीही मोठी खेळी आली नाही. कर्णधार म्हणून त्याच्यावर केवळ धावा करण्याचा दबाव नाही, तर आपल्या जागेबद्दल उठणाऱ्या प्रश्नांना उत्तर देण्याचेही आव्हान आहे.भारताचा घरच्या मैदानावर कसोटीतील रेकॉर्ड नेहमीच उत्कृष्ट राहिला आहे, परंतु अलीकडे न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या संघांनी आपल्याला बॅकफूटवर ठेवलं होतं. २०२६ मध्ये भारताला आपल्या भूमीवर अनेक महत्त्वाचे कसोटी सामने खेळायचे आहेत. फिरकीला अनुकूल पिचेसवर फलंदाजांचा संघर्ष आणि वरिष्ठ खेळाडूंच्या अनुपस्थितीत युवा खेळाडूंची सातत्यपूर्ण कामगिरी ही भारताची सर्वात मोठी परीक्षा असेल.एकीकडे गंभीरच्या प्रशिक्षणात भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ आणि आशिया कप जिंकून व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले, तर दुसरीकडे कसोटी फॉरमॅटमध्ये संघाला काही लाजिरवाण्या पराभवांना सामोरे जावे लागले आहे. गंभीरच्या 'आक्रमक' रणनीतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत,

## मुंबई इंडियन्सचा मोठा निर्णय, नवीन वर्षात केला बदल

मुंबई : नवीन वर्षात मुंबई इंडियन्सच्या संघाने आता एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे चाहत्यांना मुंबई इंडियन्सच्या संघाचे एक वेगळे रुप पाहायला मिळणार आहे. मुंबई इंडियन्सने नवीन वर्षाक एक व्हिडिओ शेअर केला आहो, हा व्हिडिओ जोरदार व्हायरल झाला आहे.

मुंबई इंडियन्स हा एक दिग्गज संघ आहे. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सने सर्वप्रथम पाच जेतेपदं पटकावण्याचा मान मिळवला होता. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सची दमदार कामगिरी झाली होती. पण मुंबई इंडियन्सने रोहित शर्माला मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदावरून हटवलं आणि त्यानंतर हार्दिक पंड्याच्या हाती नेतृत्व सोपवलं. त्यानंतर मुंबई इंडियन्सच्या संघाला पूर्वीसारखं यश मिळालं नाही. कारण मुंबईला त्यानंतर एकही जेतेपद पटकावता आलं नाही. महिलांच्या टी २० लीगमध्येही मुंबई इंडियन्सच्या संघाने दमदार कामगिरी केली आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली महिलांच्या संघाने चांगले यश मिळवले आहे आणि यावर्षी पुन्हा एकदा जेतेपद जिंकण्यासाठी त्या सज्ज झाला आहेत. पण त्यापूर्वी मुंबई इंडियन्सच्या संघाने एक मोठा निर्णय घेतला आहे.

मुंबई इंडियन्स शक्यतो आपल्या कोणत्याही गोष्टींत बदल करत नाही. महिलांच्या टी २० लीगला यावर्षी ९ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. पण या स्पर्धेपूर्वी मात्र त्यांनी एक मोठा बदल करायचे ठरवले आहे.







## महत्त्वाचे...

### मनोज जरांगे पाटलांनी घेतली भाजपच्या पूजा मोरे यांची बाजू



मुंबई -महापालिका निवडणुकांचे वारे जोरात वाहू लागले असताना राजकीय लढाई आता थेट सोशल मीडियावर उतरल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. मात्र, या डिजिटल रणांगणात मुद्द्यांवर चर्चा होण्याऐवजी वैयक्तिक हल्ले, बदनामी आणि जुन्या व्हिडिओंच्या आधारे राजकारणाची पातळी घसरताना पाहायला मिळत आहे. पुण्यातील भाजप उमेदवार पूजा मोरे यांच्या जुन्या व्हिडिओंच्या माध्यमातून सुरू असलेल्या ट्रोलिंगमुळे वातावरण तापले असून, या प्रकारावर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. नाशिक दौऱ्यावर असताना त्यांनी या ट्रोलिंगविरोधात उघड भूमिका घेत, संबंधितांना गंभीर इशारा दिल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.निवडणुकीच्या काळात उमेदवारांच्या कामगिरी, धोरणे आणि जनतेसाठी असलेल्या भूमिकांवर चर्चा होणे अपेक्षित असते. मात्र, सध्याच्या घडीला सोशल मीडियावर जुने व्हिडिओ, पूर्वीची वक्तव्ये आणि वैयक्तिक आयुष्याशी संबंधित बाबी उकरून काढून उमेदवारांना लक्ष्य करण्याचा प्रकार वाढताना दिसतो आहे. पूजा मोरे यांच्या बाबतीतही हाच प्रकार घडत असून, त्यांच्या जुन्या व्हिडिओंचा आधार घेत त्यांच्यावर टीका, टीपण्णी आणि ट्रोलिंगचा मारा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी या प्रवृत्तीवर कडाडून टीका करत, अशा राजकारणामुळे लोकशाहीची प्रतिष्ठा धोक्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

# सूर्याजी पिसाळ जसा लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील

## उद्धव ठाकरेंचा एकनाथ शिंदेंवर खोचक टोला, मोदी-शहांवरही साधला निशाणा



**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई - जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगरपालिकेची आहे. सूर्याजी पिसाळ जसा 400 वर्ष लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील, असा खोचक टोला शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर लगावला आहे. उमेदवारांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरेंनी शिंदेंसह पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधला.

उद्धव ठाकरे म्हणाले, जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगरपालिकेची आहे. सूर्याजी पिसाळ सारखा गद्दारीचा टिळा 400 वर्षे झाली तरी मिटला नाही तर या गद्दारांचे काय? सूर्याजी पिसाळ जसा 400 वर्षे लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील, असा हल्लाबोल ठाकरेंनी केला.दोन गुजरात्यांच्या हातात आपल्याला मुंबई द्यायची नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर निशाणा साधला. तसेच आपण मनाने काम करावे, समोरून धनाचा वर्षाव मोठ्या प्रमाणावर होणार आहे. एकही जागा नतद्रष्टांच्या हाती द्यायची नाही. तसेच जे आता इथे आले आहेत ते सर्व निवडून आले पाहिजेत, असेही ठाकरेंनी म्हटले.

मुंबईसाठी ठाकरेंचा जाहीरनामा:घरकाम करणाऱ्या महिलांना 1500 रुपये, तर तरुणांना 1 लाखांपर्यंत सहाय्यता निधीदरम्यान, दादर येथील शिवसेना भवनात आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी संयुक्तपणे महानगरपालिका उमेदवारांसमोर एक महत्त्वाचे प्रेझेंटेशन सादर केले, ज्यामध्ये सत्ता आल्यास मुंबईच्या विकासासाठी नेमके काय करायचे, याबाबतचा सविस्तर आराखडा मांडण्यात आला. हे प्रेझेंटेशन आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी सादर केले जाणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सुधारणा करून लवकरच मुंबईकरांसाठीचा अधिकृत 'वचननामा' जाहीर केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.महापलिकेच्या मालकीची जमीन खासगी विकासकांच्या घशात न घालता तिथे मुंबईकरांची सोय करणाऱ्या शासकीय, महापालिका, बेस्ट आणि पोलिस कर्मचाऱ्यांना तसेच गिरणी कामगारांना हक्काची घरे देणार. तसेच मुंबई महापालिकेचे स्वतःचे गृहनिर्माण प्राधिकरण असेल. इतकेच नव्हे तर पुढील 5 वर्षात 1 लाख मुंबईकरांना परवडणारी घरे दिली जातील, अशी आश्वासने आदित्य ठाकरे तसेच अमित ठाकरे यांनी दिली आहेत. शिवसेना आणि मनसे यांच्या वचननाम्यात मुंबईकरांसाठी काय आहे. वाचा सविस्तर

# आत्ताच्या आत्ता हरिभाऊ राठोड यांची सुरक्षा काढा:राहुल नार्वेकरांचे मुंबई पोलिसांना निर्देश



**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईत मोठा वाद निर्माण झाला आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी कुलाबा परिसरात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राजकीय पक्षांच्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरू दिले नाहीत, असा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. तसेच बीएसपी नेते व माजी खासदार हरिभाऊ राठोड आणि राहुल नार्वेकर यांच्यात देखील वाद झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राहुल नार्वेकरांचा व्हिडिओ ट्विट करत 'सन्माननीय अध्यक्ष महोदय' असे म्हणत निशाणा साधला आहे.व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये राहुल नार्वेकर हे थेट माजी खासदार हरिभाऊ राठोड यांची तातडीने सुरक्षा काढून घेण्यास मुंबई पोलिसांना सांगताना दिसून आले आहेत. त्यांनी जॉइंट सीपींना फोन लाऊन थेट सुरक्षा आत्ताच्या आत्ता काढा, हा विधानसभा अध्यक्षांचा आदेश आहे, असे म्हणत असल्याचे दिसून येत आहे.उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या संदर्भात राहुल नार्वेकर यांनी धमकीचा इशारा देण्याच्या पद्धतीत बोलताना दिसून येत आहे.

# सोलापूरमध्ये तिकीट वाटपावरुन राडा:मनसे नेत्याची हत्या झाल्याचा जिल्हाप्रमुखांचा दावा



**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

सोलापूरमध्ये भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपच्याच कार्यकर्त्यांने पक्षाचे कार्यालय फोडले असल्याची घटना समोर आली आहे. शहरातील जोशी गल्लीतील माजी नगरसेवक शंकर शिंदे यांच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आली असून परिसरात तणाव निर्माण झाला असल्याची माहिती समोर आली आहे. याच वेळी मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या मनसे नेत्याची हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेसंदर्भात प्राथमिक माहिती अशी की, हा वाद भाजपच्याच दोन गटात झाला आहे. यातील एका गटातील कार्यकर्त्याला तिकीट मिळाल्यानंतर दुसऱ्या गटाने कार्यकर्त्याच्या कार्यालयाची तोडफोड केली आहे. कार्यालय फोडल्यानंतर सर्वत्र काचा पसरल्या होत्या. तसेच परिसरात तणावाचे वातावरण पसरले होते. समाजात तणाव नको म्हणून मनसे नेते बाळासाहेब सरवदे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला.या प्रकरणी मनसे जिल्हाप्रमुख दिलेल्या माहितीनुसार, मनसे विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांच्या काकू भाजपकडून उमेदवारीसाठी इच्छुक होत्या. परंतु, त्यांना तिकीट न मिळाल्याने याचा जाब विचारण्यासाठी बाळासाहेब सरवदे हे शंकर शिंदे यांच्या संपर्क कार्यालयात गेले असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. तसेच यात त्यांचा मृत्यू झाल्याचाही दावा मनसे जिल्हाप्रमुख प्रशांत इंगळे यांनी केला आहे.प्रभाग दोनमध्ये भाजपच्या अधिकृत उमेदवार शालन शिंदे आणि बंडखोर उमेदवार रेखा सरवदे यांच्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या वादाला आता हिंसक वळण लागले. अर्ज माघारी घेण्यावरून दोन्ही गटांत झालेल्या वादात भाजप नेते शंकर शिंदे यांचे कार्यालय फोडण्यात आले, तर याचवेळी मध्यस्थीसाठी आलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्यावर शिंदे गटाच्या समर्थकांनी जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सरवदे यांना तातडीने सोलापूरच्या सहकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते,

# लढाई मनपाची, मुद्दा नागरिकांचा: 'तुमचीच लेकरं-बाळं सत्तेत पाहिजेत का?

## घराणेशाही, रात्री 3 वाजता येणारे पाणी आणि गुन्हेगारीवरुन शिंदे-ठाकरेंची सेना, भाजपमध्ये खडाजंगी!

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

'तुम्हाला घराणेशाहीच पुढे न्यायची आहे का? तुमचीच लेकरं-बाळं सत्तेत पाहिजेत का? प्रत्येक ठिकाणी तुमच्याच घरातील मंडळी सत्तेत हवी आहेत का?', असा सवाल करत ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री संजय शिरसाट यांच्या कन्या हर्षदा शिरसाट यांना पदमपुऱ्यातून मिळालेल्या उमेदवारीवरून नाव न घेता टीका केली. आमचा घराणेशाहीला विरोध आहे, असा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला. शिवसेनेच्या अरुणा चव्हाण यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. त्या म्हणाल्या की, 'घराणेशाही ही सर्वच राजकीय पक्षांमध्ये आहे. संधी सर्वांनाच दिली जाते. मात्र, एखाद-दुसऱ्या ठिकाणी काही घडले असेल, तर त्यावर आम्ही भाष्य करू शकत नाही.' दरम्यान, 'तिकीट न मिळाल्याने काही कार्यकर्ते नाराज झाले असून ते रडत आहेत,' असा आला, तर 'काही जण थेट भाजपच्या पदाधिकाऱ्यांसमोर जात आहेत. सत्ताधारी केवळ बोलतात, प्रत्यक्षात काहीच करत नाहीत', अशी टीकाही यावेळी करण्यात आली.

चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे यांच्यातही तिकीट वाटपावरून वाद सुरू झाल्याचा उल्लेख यावेळी काही जणांनी केला. 'हिंदूंवर टीका करणाऱ्यांना ठाकरे गटाने तिकीट दिले असल्याने घराणेशाहीवर टीका करण्याचा नैतिक अधिकार त्यांना नाही,' असा टोला शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी लगावला. छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'दिव्य मराठी ॲप'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'लढाई मनपाची, मुद्दा नागरिकांचा' या टॉक शोला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. प्रभाग क्रमांक 20 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात राजकीय आरोप-प्रत्यारोपांसह नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर सखोल चर्चा झाली.

सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांकडे प्रश्नाची उत्तरे नाहीत

नितीन पवार म्हणाले की, 'सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांकडे प्रश्नाची उत्तरे नाहीत म्हणून ते या कार्यक्रमाला आले नाहीत.' 'तुमचे



उमेदवार कुठे आहेत?' असा सवाल करताच शिवसेनेचे सागर वाघचौरे म्हणाले की, 'आम्ही लोकांची कामे आजही करतो. यांनी आजपर्यंत कुणाची कामे केली? जनता यांना कॉल सुद्धा करत नाही. आम्ही लोकांच्या सेवेसाठी काम करत आहोत. ठाकरे गटाने उमेदवार आयात केल्याने आम्हाला काही फरक पडत नाही.' यानंतर ठाकरे गटाने 'नगरसेवक घरी बसतात जनतेमध्ये जात नाहीत,' असे प्रत्युत्तर दिले.

उमेदवार महेंद्र रमंडवाल म्हणाले की, 'आमच्या परिसरात महानगरपालिकेच्या लाइट, पाणी, रस्ते या सर्व गोष्टीचा मोठा अभाव आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात घाण दिसून येते. सर्वच पक्षात घराणेशाही दिसून येत आहे. काही मोठ्या नेत्यांना उमेदवारी मिळू नये म्हणून भाजपने नेत्यांच्या मुलांना तिकीट दिले नाही. आमच्या प्रभागात घाणीचे साम्राज्य दिसून येते. महिला सुरक्षेचा विषय देखील महत्त्वाचा आहे. ज्यांची सत्ता आली त्यांचे मतदान आहे तिथेच विकास केला जातो विरोधकांच्या ठिकाणी कामे केली जात नाही.'

ठाकरे गटाचे पदाधिकारी म्हणाले की, 'आमच्या प्रभागात दोन ते 3 मोठे चौक आहेत. या चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. अपघात होतात याकडे लक्ष दिले पाहिजे,

# वय 22, तीन लग्न, सात पोरं; चौथ्यांदा बोहल्यावर चढण्याची इच्छा, गर्भवती पत्नीने विरोध करताच भयंकर घडलं




**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

पाटणा: एका 22 वर्षीय तरुणाने त्याच्या तिसऱ्या पत्नीची हत्या केली कारण ती त्याच्या चौथ्या लग्नात अडथळा आणत होती. या घटनेपासून आरोपी पती फरार आहे. त्याला अटक करण्यासाठी पोलिस शक्य त्या ठिकाणी छापे टाकत आहेत. बिहारमधील पूर्णिया येथे हे धक्कादायक हत्याकांड उघडकीस आले आहे. महिलेच्या निर्घृण हत्येमुळे संपूर्ण गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पूर्णिया जिल्ह्यातील अकबरपूर पोलिस स्टेशन हद्दीतील जमरा गावात ही घटना घडल्याची माहिती आहे. गावातील रहिवासी सिंटू ऋषिदेव पंजाबमध्ये मजूर म्हणून काम करतो. त्याच्या गावाजवळील ओराहा येथील रहिवासी कैलाश ऋषिदेव देखील रोजगाराच्या शोधात त्याच्या संपूर्ण कुटुंबासह पंजाबला गेला होता. तिथे सिंटू ऋषिदेव कैलाशची मुलगी मंजू कुमारी हिच्या प्रेमात पडला. सिंटूची कमाई पाहता कैलाशने त्याचं लग्न मंजूशी लावून दिले. संपूर्ण कुटुंब फक्त आठ दिवसांपूर्वीच पंजाबहून पूर्णियाला आले होते. मृत महिलेची आई रत्नाणी देवी यांनी सांगितले

# मुंबईसाठी ठाकरेंचा जाहीरनामा:घरकाम करणाऱ्या महिलांना 1500 रुपये, तर तरुणांना 1 लाखांपर्यंत सहाय्यता निधी;



**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आता अवघे 15 दिवस शिल्लक असताना राजकीय हालचालींना वेग आला आहे. दादर येथील शिवसेना भवनात आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी संयुक्तपणे महानगरपालिका उमेदवारांसमोर एक महत्त्वाचे प्रेझेंटेशन सादर केले, ज्यामध्ये सत्ता आल्यास मुंबईच्या विकासासाठी नेमके काय करायचे, याबाबतचा सविस्तर आराखडा मांडण्यात आला. हे प्रेझेंटेशन आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी सादर केले जाणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सुधारणा करून लवकरच मुंबईकरांसाठीचा अधिकृत 'वचननामा' जाहीर केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

महापलिकेच्या मालकीची जमीन खासगी विकासकांच्या घशात न घालता तिथे मुंबईकरांची सोय करणाऱ्या शासकीय, महापालिका, बेस्ट आणि पोलिस कर्मचाऱ्यांना तसेच गिरणी कामगारांना हक्काची घरे देणार. तसेच मुंबई महापालिकेचे स्वतःचे गृहनिर्माण प्राधिकरण असेल. इतकेच नव्हे तर पुढील 5 वर्षात 1 लाख मुंबईकरांना परवडणारी घरे दिली जातील, अशी आश्वासने आदित्य ठाकरे तसेच अमित ठाकरे यांनी दिली आहेत. शिवसेना आणि मनसे यांच्या वचननाम्यात मुंबईकरांसाठी काय आहे, हे सविस्तर पाहूया.

बेस्ट बस भाडे

तिकीट दरवाढ कमी करून रुपये 5,10,15,20 फ्लॅट रेट ठेवण्यात येणार. तसेच बेस्टच्या ताफ्यात 10 हजार इलेक्ट्रिक बसेस, 900 डबल-डेकर इलेक्ट्रिक बसेस असतील. विद्यार्थी आणि महिलांसाठी विशेष बेस्ट बसमध्ये मोफत प्रवास सुविधा सुरू करण्यात येतील.

सार्वजनिक आरोग्य

मुंबईकरांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य असणार आहे. मुंबईत पांच नवीन वैद्यकीय महाविद्यालये, पालिका रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये रुग्णांना जेनेरीक औषधी उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी 24x7 हेल्थ केअर कंट्रोल रूम आणि हेल्थ टु होम सेवा, महापालिकेची स्वतःची रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात येणार. तसेच मुंबई महापालिकेचे स्वतःचे कॅन्सर रुग्णालय असेल, असे वचन अमित ठाकरे यांनी दिले.

शिक्षण

पालिकेच्या शाळांच्या जमिनी बिल्डरांच्या घशात जाऊ न देण्याचा ठाम निर्धार व्यक्त करत, शैक्षणिक गळती रोखण्यासाठी महापालिका शाळांमध्येच आता बारावीपर्यंतचे ज्युनिअर कॉलेज सुरू करण्यात येणार. यासोबतच, मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी सर्व माध्यमांच्या शाळांत 'बोलतो मराठी' हा विशेष उपक्रम राबवून पालिकेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यावर भर दिला जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.

घरकाम करणाऱ्या महिलांची नोंदणी करणार आणि नोंदणीकृत महिलांना दर महिन्याला रू.1,500 स्वाभिमान निधी. कोळी मच्छीमार महिला विक्रेत्यांची नोंदणी, अर्थसाह्य आणि नवीन परवान्यांची तरतूद ज्यात समुदायांतर्गत परवान्यांच्या हस्तांतरणाची सोय केली जाईल. कष्टकरी मुंबईकरांसाठी फक्त 10 रुपयांत नाश्ता आणि दुपारचे जेवण देणारी मासाहेब किचन्स. मुंबईतील आमच्या भगिनींच्या लहान मुलांसाठी उत्कृष्ट दर्जाची पाळणाघरे उभी करू. मुंबईतील प्रमुख रस्त्यांवर दर 2 किलोमीटरला एक अशी महिलांसाठी उत्तम स्वच्छता असलेली शौचालये बांधली जातील.

प्रत्येकाला सुरक्षित पार्किंग

महापालिकेच्या वाहनतळांमध्ये पार्किंग मोफत असे तसेच नव्या पुनर्विकसित इमारतींमध्ये प्रत्येक फ्लॅटला पार्किंग देण्याचे आश्वासन यावेळी ठाकरे बंधूंनी दिले.

वंदनीय बाळासाहेब ठाकरे स्वयं रोजगार अर्थसहाय्य योजना

एक लाख तरुण-तरूणींना प्रत्येकी 25 हजार ते 1 लाख रुपयांचा स्वयंरोजगार सहाय्यता निधी, तसेच 25 हजार गिग वर्कर्सना आणि डबेवाल्यांना ई-बाईकसाठी बिनव्याजी कर्ज देण्यात येणार. रस्त्यांइतकेच फूटपाथही महत्वाचे आहेत, 'पेडेस्ट्रियन फर्स्ट' धोरणाची अंमलबजावणी करून फुटपाथ पेव्हर ब्लॉक-फ्री आणि दिव्यांग-स्नेही करणार. शब्दांचा खेळ करून मुंबईतील मोकळ्या जागा आणि विशेषतः महालक्ष्मी रेसकोर्स, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, आरे जंगल आणि अन्य मोकळ्या जमिनी कोणत्याही परिस्थितीत बिल्डरांना आंदण दिल्या जाणार नाहीत.

मुंबईकरांना मोकळा श्वास

गेल्या तीन वर्षांत वाढलेले प्रदूषण तातडीने कमी करण्यासाठी मुंबई पर्यावरण कृती आराखड्याची कठोर अंमलबजावणी करणार. हवा गुणवत्ता निर्देशांक नियंत्रणात आणण्यासाठी मुंबई बांधकाम पर्यावरणीय व्यवस्थापन योजना अंमलात आणणार.

१ २ ३ ४ ५ ६